अमृत कुंभ

परमपिता शिव परमात्मा



वर्ष १२ | अंक ५ | डिसेंबर १८ - जानेवारी १९ | मूल्य रु. ११/-

शिर्डी : शिवदर्शन मेळ्याचे उद्घाटन पश्चात ग्रुप फोटोत महंत रामगिरीजी, भ्राता दशरथ भाई, ब्र. कु. सुनंदा दीदी, वासंती दीदी, भारती दादी व पद्मा दीदी.

वाघोली (पुणे) : जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रदीप दादा यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. अनिता बहेन.

नांदुर शिर्गोटे (संगमनेर) : येथे गीता पाठशाळेचे उद्घाटन करतांना ब्र. कु. सुनंदा दीदी, वासंती दीदी, उषा दीदी व भारती बहेन.

नागठाणे (सातारा) : 'गणपतीचे आध्यात्मिक रहस्य' वाटस अप वर पाठविण्याचे जागतिक रेकॉर्ड करतांना श्री. अशोक राव गोडसे सोबत ब्र. कु. डॉ. दीपक, ब्र. कु. सुवर्णा व अंकिता बहेन.

मालाड (पू.) : मालवणी समाजाच्या दिवाळी कार्यक्रमात ब्र. कु. कुंती बहेन यांचा सन्मान करतांना प्रतिष्ठित महिला.

विक्रोळी : भारतीय महिला क्रिकेटपटू मोश मेश्राम व पूनम राऊत यांना 'स्पोर्टस् विंग'ची माहिती देतांना ब्र. कु. जयश्री बहेन.

चंद्रपूर : चैतन्य देवींच्या झांकीचे उद्घाटन करतांना राजयोगिनी कुसुम दीदी, आमदार भ्राता किर्तीकुमार व अन्य मान्यवर.

घाटकोपर : चैतन्य देवींच्या झांकीचे उद्घाटन करतांना राजयोगिनी नलिनी दीदी, पर्यटन मंत्री श्री. रावल व त्यांच्या धर्मपत्नी, ब्र. कु. निकुंज व अन्य.

परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १२, अंक ५. डिसेंबर २०१८– जानेवारी २०१९

मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठावरील चित्रात पिताश्री ब्रह्माबाबांच्या लौकिक व अलौकिक जीवनाच्या विविध छटा दर्शविण्यात आल्या आहेत. डाव्या बाजूला जो फोटो आहे, तो आहे त्यांच्या लौकिक जीवनाचा. सन १९२० मध्ये दादा लेखराज हे हिरे-जवाहराचे कुशल व्यापारी होते. त्यानंतरचा फोटो आहे, १९६५चा. जेव्हा पिताश्री हे आंतरराष्ट्रीय धर्मनेता ब्लूमबर्ग व त्यांचे सुपुत्र यांना ईश्वरीय ज्ञान देतानाचा आहे. तिसरा फोटो आहे १९६३चा, जेव्हा पिताश्री ब्रह्मावत्सांना पत्र लिहित आहेत. चौथा फोटो आहे सन १९५३चा, जेव्हा आबू-बृजकोठीत दादीजींच्या समवेत बाबा भाजी कापत आहेत.

पिताश्रींनी मनसा, वाचा, कर्मणा कशी सेवा केली, हे यावरून सहज स्पष्ट होते. आपणही त्यांना फॉलो करू या. आज आपली संस्था विश्वविद्यालय बनली आहे; याचे सूचक म्हणून मा. आबू येथील विशाल, मनोहर 'ॐ शांती भवन' दर्शविण्यात आले आहे.

– प्रकाशक अमृतकुंभ

१) पिताश्री ब्रह्माबाबांच्या मुख्य विशेषता (संपादकीय) २
२) संगमयुगी श्रेष्ठ भाग्य! (कविता) ५
३) कल्पकल्प होणाऱ्या परमात्म अवतरणात पिताश्रींची महत्वपूर्ण भूमिका! (भाग १) ६
४) अंतिम समयाची तयारी १०
५) मधुबन पावन धरती (कविता) १३
६) सफल करा व सफलतामूर्त बना १४
७) सचित्र सेवावृत्त १६
८) अमृतवेळेला झोप, सुस्ती वा आळस येऊ नये, यासाठी काय कराल? १८
९) वाचकांशी हितगुज २०
१०) निःस्वार्थ सेवा देई आत्मिक सुखाचा मेवा (भाग १) २१
११) कर्म अधिक श्रेष्ठ की भाग्य ...(भाग २) २४
१२) सकारात्मक विचार व सकारात्मक दृष्टिकोन यांचे जीवनातील महत्त्व २९
१३) व्यसनमुक्ती, मनोनिग्रह आणि राजयोग ३१

फोटो, लेख आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी.

वार्षिक वर्गणी रु. ६५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/–

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** – www.amrutkumbh.com.



(संपादकीय)

पिताश्री ब्रह्माबाबांच्या मुख्य विशेषता

पिताश्री ब्रह्माबाबा हे साकार सृष्टीचे आदि पिता, युगपुरुष आहेत. निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांना साकार माध्यम बनवून, त्यांच्याद्वारे सृष्टी परिवर्तनाचे महान कार्य करतात. त्यामुळे परमात्मा शिव पित्यानंतर या सृष्टीरुपी रंगमंचावर सर्वात महत्त्वाची भूमिका जर कोणाची असेल तर ती आहे, प्रजापिता ब्रह्माबाबांची. वर्तमान समय हा कलियुगाचा अंतिम समय असून, निराकार शिव परमात्म्याचे, दिव्य अवतरण, साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात सन १९३६ मध्ये झाले आहे. निराकार शिव परमात्मा, ब्रह्मा मुखाद्वारे सत्य गीता ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देत आहेत. त्याद्वारेच मानव देवता बनतो व या भारतभूमीवर पुन्हा स्वर्ग स्थापन होतो. म्हणूनच 'ब्रह्माद्वारे स्थापना' असे गायन केले जाते.

सन १९३६ ते १९६९ या सुमारे ३३ वर्षाच्या कालावधीत प्रजापिता ब्रह्माबाबांनी तीव्र पुरुषार्थ केला. त्याग, तपस्या व सेवा यांच्याद्वारे आपली संपूर्ण कर्मातीत फरिश्ता स्थिती प्राप्त केली व १८ जानेवारी १९६९ रोजी त्यांनी आपल्या नश्वर शरीराचा त्याग करून ते अव्यक्त वतनवासी बनले. **यावर्षी त्यांचा ५० वा दिव्य स्मृती दिवस असून दरवर्षी तो 'समर्थी दिवस' म्हणून विश्वभरातील ब्रह्मावत्सांद्वारे पाळला जातो.** आपण सर्व मुलांनी देखील त्यांच्यासारखी अव्यक्त फरिश्ता स्थिती प्राप्त करावी, हीच प्रजापिता ब्रह्माबाबांची एकमेव शुभभावना व शुभकामना आहे. त्यांची ही शुभकामना पूर्ण करण्यासाठी आपण कोणत्या विशेषता जीवनात धारण करणे, आवश्यक आहे; हे त्यांच्या जीवन चरित्रावरून सार रूपाने पाहू या व 'फॉलो फादर' करूया. हीच पिताश्रींना खरी श्रद्धांजली ठरेल.

आत्मिक दृष्टी आणि वृत्ती

पिताश्री ब्रह्माबाबांनी पहिल्या दिवसापासून आत्मिक दृष्टी व वृत्तीचा अभ्यास केला. कोणीही त्यांच्यासमोर आला तरी ते त्याला आत्मिक दृष्टीनेच पहात असत. त्यामुळे लहान-मोठी, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, जाती-धर्म हे सर्व भेदाभेद समाप्त झाले. फलस्वरुप सर्वांना हाच आभास होत असे की, बाबा माझे आहेत. असाच अभ्यास आपणा सर्वांनी केला पाहिजे. याचेच गायन आहे - 'जशी दृष्टी तशी सृष्टी'. ज्ञानमार्गात पहिला धडा हाच आहे की, सर्वांना आत्मिक दृष्टीने पाहा. दृष्टी बदलल्याने सर्व गोष्टी आपोआपच बदलतात. जेव्हा आपण आत्म्याला पहातो, तेव्हा ही सृष्टी स्वतःच जुनी दिसायला लागते. फरिश्ता हा सदैव आत्मअभिमानी असतो. अर्थात स्वतःला आत्मा समजून, आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाशी आत्मिक व्यवहार करतो. **तात्पर्य म्हणजे देहअभिमानात येणे म्हणजे मानव बनणे व सदैव आत्मअभिमानी स्थितीत रहाणे म्हणजे फरिश्ता (देवदूत) बनणे होय.**

जसे पॉवर हाऊसशी कनेक्शन जोडतांना तारेला तार जोडावी लागते. तारेवरील रबर काढून टाकावे लागते. तसेच परमात्मा पित्याशी कनेक्शन जोडतांना देहरुपी रबर काढावे लागते अर्थात स्वतःला आत्मा समजून, शरीराचे भान विसरावे लागते. त्यामुळे ब्राह्मण जीवनात 'मी अशरीरी आत्मा आहे'. हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणूनच जेथेही पहाल, ज्याला ही पहाल, त्याचे आत्मिक स्वरुपच

दिसले पाहिजे. जर आपल्या वृत्तीत देहअभिमान असेल तर दृष्टीही देहअभिमानी बनेल. म्हणूनच आपल्या वृत्ती व दृष्टीला आत्मिक बनवा – म्हणजे आपले डोळे हे एखाद्या जादूच्या डबीप्रमाणे दुसऱ्यांना साक्षात्कार करविण्याचे साधन बनतील.

ईश्वराला संपूर्ण समर्पण

पिताश्रींच्या जीवनातील पहिले हिंमतीचे पाऊल होते – संपूर्ण समर्पण– त्यांनी आपले तन ईश्वरीय सेवेत समर्पित केले. मन 'सदा मन्मनाभव' या विधीद्वारे सिद्धीस्वरुप बनवले. भविष्याची कुठलीही चिंता न करता, निश्चिंत होऊन यज्ञात धन समर्पित केले. आपले सर्व लौकिक संबंधही समर्पित करून अलौकिक बनवले. कुठलेही संबंध सोडले नाहीत तर कल्याणच केले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'मी पणा' अथवा अभिमानाची बुद्धी समर्पित केली. त्यामुळे ते तन, मन व बुद्धी यांच्याद्वारे निर्मल, शीतल व सुखदायी बनले. संपूर्ण समर्पणतेमुळे त्यांची बुद्धी सदैव हलकी होती, मन निश्चिंत होते व चेहऱ्यावर सदैव, बेफिकीर बादशहाचे चिन्ह स्पष्ट दिसत होते. याबाबतीत आपणही 'फॉलो फादर' करु या.

पिताश्री ब्रह्मबाबा हे संपूर्ण समर्पणतेच्या आधारे संपूर्ण बनले. त्यामुळे आपणही जितके समर्पण होऊ, तितकीच संपूर्णता आपल्याला प्राप्त होईल, त्यामुळे आता समर्पण समारोह साजरा करा अर्थात देहअभियानाचे समर्पण, स्वभाव-संस्कारांचे समर्पण, कर्मेंद्रियांच्या आकर्षणाचे समर्पण, संबंधांचे समर्पण करा. फलस्वरुप आपली ब्रह्माबापसमान संपूर्ण स्थिती लवकरच बनेल.

देह व देहाच्या संबंधांपासून सदैव उपराम (अलिप्त) व नष्टोमोहा

ज्या दिवसापासून निराकार शिवबाबांनी, ब्रह्माबाबांच्या शरीराला आधार बनवले, त्या दिवसापासून ब्रह्माबाबा आपल्या देह व देहाच्या संबंधांपासून उपराम व नष्टोमोहा बनले. ब्रह्माबाबा सदैव हेच सांगत, **''मुलांनो, हे शरीर माझे नाही. शिवबाबांना लोन (कर्जाऊ) दिले आहे. त्यामुळे शिवबाबा स्वतः त्याचा सांभाळ करतील. हा हुसेनचा घोडा आहे. हे संबंधी देखील माझे नाहीत. मी तर स्वतः शिवबाबांचा मुलगा आहे. हे सर्व शिवबाबांचे आहे.''** या स्मृतीच्या आधारे ब्रह्माबाबा 'डबल लाइट' बनले. असेच आपण ब्रह्माबाबांना फॉलो करुया व देह आणि देहाच्या संबंधांपासून उपराम व नष्टोमोहा बनूया.

केवळ कर्म करण्यासाठी या जुन्या शरीराचा आधार घ्या. त्यानंतर फरिश्ता स्वरुपात अथवा निराकारी आत्मिक स्वरुपात स्थित व्हा. अशाप्रकारे आपल्या शरीराचे भान विसरणे, याला म्हणतात त्यागाचे पहिले पाऊल अर्थात पाहुणा बनून देहात निवास करणे. शिवबाबांनी हे शरीर थोड्या काळासाठी सेवा अर्थ दिले आहे. जसे ब्रह्माबाबांच्या संकल्पात, वाणीत हेच होते की, हे शरीर (रथ) शिवबाबांचे आहे. तसेच आपला देखील हाच वायदा आहे की, हे तन, मन, धन सर्व काही तुझेच आहे, माझे नाही. तात्पर्य म्हणजे 'माझे-माझे' म्हटल्याने देहभान उत्पन्न होतो व 'शिवबाबा सर्व काही तुझे-तुझे' म्हटल्याने, आपण उपराम (अलिप्त) बनतो. अशाप्रकारे उपराम रहाणाऱ्यांना शिवबाबांची आठवण स्वतःच येते.

निमित्त व निर्माण –

जसे शिवबाबा शरीराचा आधार निमित्त मात्र घेतात. शरीराला आधार समजल्याने त्याच्या अधीन होत नाहीत. तसेच आपणही निमित्त मात्र शरीराचा आधार घेऊ या. त्याचबरोबर ईश्वरीय सेवेसाठी स्वतःला निमित्त समजू या. फलस्वरुप आपल्यात निर्मानता (नम्रता) येईल व आपल्याला सेवेत सदा सफलता प्राप्त होत राहिल. हे लक्षात ठेवा की जितकी नम्रता तितकीच सफलता. आपल्यात नम्रता असेल तर सर्वजण आपल्याला नमन करतील.

विश्व निर्माणाचे कार्य करण्यासाठी निर्मान बना. जर आपल्यात निर्मानता वा नम्रता नसेल तर कोणतेही निर्माणाचे कार्य आपण करू शकणार नाही. त्यामुळे सदैव हे घोषवाक्य लक्षात ठेवा – 'पहले आप'. दुसऱ्यांना पुढे करा. दुसऱ्यांना सन्मान

द्या म्हणजे ते आपोआपच तुम्हाला मनापासून मान देतील.

कोणत्याही सेवेसाठी निमित्त बनण्याची संधी मिळणे, ही एक भाग्याची निशाणी आहे. निमित्त भावच्या विधीद्वारे सेवेत वृद्धी होते. परंतु निमित्त भाव बरोबरच सर्वांचे स्नेही बनणेही आवश्यक आहे. कारण स्नेह नसेल तर आपण दयाळू बनू शकणार नाही. तसेच नम्रचित्त बनू शकणार नाही.

कर्म व योगाचे सदा संतुलन

पिताश्री ब्रह्माबाबा हे साकार कर्मयोगीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. कोणी कामात कितीही व्यस्त असला तरी ब्रह्माबाबां इतका हमखास नसेल. तरीदेखील ब्रह्माबाबांनी कर्मयोगी बनून दाखवलं. सदैव स्वतःला निमित्त कर्म करणारा (करनहार) समजून कर्म केले व शिवबाबांना कर्म करवून घेणारा (करावनहार) समजले. त्यामुळे ते सदैव हलके होते. **तसेच आपणही कर्मयोगी बनून, आपली बुद्धीची तार शिवबाबांशी जोडूया व निमित्त बनून कर्म करु या. म्हणजे आपल्याला कधीही थकावट येणार नाही व आपण सदा आनंदी (एवर हॅपी) राहू. एवढंच नव्हे तर कर्मक्षेत्रावर डान्स (नृत्य) केल्यासारखे वाटेल.**

जसे शरीर व आत्मा एकत्रित (कम्बाइण्ड) होऊन, कर्म केले जाते. तसेच कर्म व योग दोन्ही सदैव एकत्र असले पाहिजेत. कर्म करतांना कधीही याद (शिवबाबांची आठवण) विसरता कामा नये. तसेच यादमध्ये असतांना कर्म विसरता कामा नये. कित्येक जण असे म्हणतात की आम्ही कर्मक्षेत्रावर गेल्यावर, याद विसरतो. यावरून सिद्ध होते की त्यांचे कर्म व याद भिन्न आहेत. परंतु वास्तविक या दोन्ही गोष्टी एकत्रित आहेत. म्हणूनच आपल्याला 'कर्मयोगी' हे टाइटल देण्यात आले आहे.

सदा दानी, महादानी व वरदानी

जसे ब्रह्माबाबांनी आपल्या समयाचे, सुखाच्या साधनांचे, आपल्या गुणांचे आपल्याला प्राप्त सर्व शक्तींचे अन्य आत्म्यांच्या उन्नतीसाठी दान केले. त्यामुळेच त्यांचे संकल्प व बोल वरदानी बनले. असे आपणही फॉलो फादर करुया. आपण जोही संकल्प करू वा बोल बोलू तो अन्य आत्म्यांसाठी वरदान रुप असला पाहिजे. महादानी अर्थात त्याग व तपस्या मूर्त. त्यामुळेच त्याग, तपस्या व वरदानांचे प्रत्यक्ष फळ म्हणून प्रत्येक संकल्प व बोल वरदान रुप बनतात. अशा महादानी वरदानी आत्म्यांनाच बापसमान म्हटले जाते.

सर्व आत्म्यांना शिवबाबांचा खजिना वाटणारे दानी बना. आपल्या सर्व शक्तींच्या द्वारे, तहानलेल्या व तडपणाऱ्या आत्म्यांना जीवनदान द्या. वरदाता बनून सर्वांना शिवबाबांच्या समीप संबंधात आणा. महादानी आणि वरदानी बनण्यासाठी विशेष दोन धारणा लक्षात ठेवा – १) मधुरता २) नम्रता.

जसे भक्तिमार्गात ज्या वस्तूची कमी असेल, त्या वस्तूचे दान दिले जाते. तर दान दिल्याने त्या वस्तूची कधीही कमी रहात नाही. कारण देणे अर्थात घेणे (प्राप्त करणे) होय. तसेच दुसऱ्याच्या इच्छा पूर्ण करणे अर्थात स्वतःला संपन्न बनविणे होय. म्हणूनच सदैव दानी, महादानी व वरदानी बना.

अथक व निद्राजीत

जसे पिताश्रींनी अथक व एकरस स्थितीचे उदाहरण बनून दाखवले तसे आपल्यालाही दुसऱ्यांसाठी उदाहरण बनले पाहिजे. वर्तमान समयी बऱ्याच ब्रह्मावत्सात निष्काळजीपणा व आळस या मुख्य दोन कमजोरी दिसून येतात. परिणामतः ते अथक व निद्राजीत बनू शकत नाहीत. असेही गायन आहे – 'जिन सोया तिन खोया' **ब्राह्मण जीवनात अमृतवेळा ही अपार प्राप्तीची वेला आहे. परमात्म मीलनाची वेला आहे. अमृतवेळेलाच भगवान भाग्य वाटतो. अशावेळी काही ब्रह्मावत्स सुस्ती व आळसाच्या आहारी जातात. मग ते भाग्यशाली कसे बनतील? म्हणून त्यांनी निद्राजीत बनणे, अति आवश्यक आहे.**

जसे पिताश्री सदैव अथक होते, तसे आपणही अथक बनूया. पहिल्यांदा स्वतःवर मेहनत करा नंतर सेवेची मेहनत करा. आता जे आपण संकल्प करतो – नंतर करु, होऊन जाईल... हे सगळे आरामाचे संकल्प आहेत. आता ते

सोडा. 'मला करायचेच आहे'... हे स्लोगन आपल्या कपाळावर लिहा म्हणजे परिवर्तन होईल. तात्पर्य म्हणजे स्वउन्नतीच्या प्लॅनविषयी केवळ विचार न करता, प्रॅक्टीकलमध्ये तो प्लॅन अंमलात आणण्याचा दृढ संकल्प करा. आपल्या उन्नतीसाठी निद्रेचा त्याग करा.

सदा निराकारी, निरहंकारी व निर्विकारी

ब्रह्मा बापसमान कर्मातीत स्थितीचा अनुभव करण्यासाठी निरंतर अभ्यास करा की, निराकारी आत्मिक स्थितीत स्थित होऊन, साकारमध्ये येऊन कर्म करीत आहे. हा अभ्यास जेव्हा नॅचरल (स्वाभाविक) होईल तेव्हा आपण निरंतर निरहंकारी व निर्विकारी स्थितीत राहू शकू. मनसा, वाचा व कर्मणा या तिन्ही गोष्टी यथार्थ होण्यासाठी केवळ ३ शब्द लक्षात ठेवा – मनसा निराकारी, वाचा निरहंकारी व कर्मणा निर्विकारी, जितके आपण निराकारी स्थितीत राहू तितके निरहंकारी व निर्विकारी देखील राहू. हाच मुख्य पुरुषार्थ आहे.

सदैव स्वतःला निराकारी देशाचे (परमधामचे) निवासी समजून, निराकारी आत्मिक स्थितीत स्थित रहा. साकारी दुनियेत रहातांना स्वतःला निराकारी आत्मा समजून चला. हाच आहे आत्म अभिमानी स्थितीचा अभ्यास. **पिताश्री ब्रह्माबाबांनी अंतिम समयी सर्व ब्रह्मावत्सांना हीच अनुपम सौगात (स्नेहभेट) दिली – 'सदा निराकारी, निरहंकारी व निर्विकारी भव' या स्नेहभेटीच्या रिटर्नमध्ये आपण सारे 'ब्रह्मा बापसमान फरिश्ता' बनण्याचा दृढ संकल्प करु या.** त्यांच्या प्रत्येक पावलावर पाऊल टाकून, आपले जीवन धन्य-धन्य करु या. आजही प्रत्येक ब्रह्मावत्साच्या हृदयी हेच बोल उमटत असतात –

मिल रही है पालना अव्यक्त की।
दे रहे हो प्यार तुम तो आज भी।
फिर भी वो साकार दिन, क्यूँ याद आते है।
कहते सारे, बाबा प्यारे, याद आते है...

– ब्रह्माकुमार शिवाजी

संगमयुगी श्रेष्ठ भाग्य!

सत्ययुगाला ब्रह्मावत्स मानतात सुवर्णतुल्य युग
संगमयुग आहे त्याहीपेक्षा श्रेष्ठ हिरेतुल्य युग ।।१।।

सत्ययुगात असतील दैवी कुळातील मातपिता
संगमयुगात लाभले आम्हा पारलौकिक मातपिता ।।२।।

सत्ययुगात मातपित्यांना वंदूनी होईल दिनारंभ
संगमयुगात शिवपित्याला वंदूनी करावा दिनारंभ ।।३।।

सत्ययुगी मातपिता देतील दैवी संस्कारांची पालना
संगमयुगावर शिवपिता देत आहे रुहानी पालना ।।४।।

सत्ययुगी पक्षांचा मधुर ध्वनी देवतांना जागवितो
संगमयुगात ब्रह्मावत्सांना स्वतः परमात्मा उठवितो ।।५।।

सत्ययुगी सुवर्ण झुल्या वरी प्राप्त होईल दैहिक सुख
संगम युगी यौगिक झुल्यावर प्राप्त होते आत्मिक सुख ।।६।।

सत्ययुगात स्वादिष्ट फळांसा रस प्राशन करुया
संगमयुगी राजयोगात एकरसस्थिती प्राप्त करुया ।।७।।

सत्ययुगात पुष्पक विमान उडवूनी सफर करुया
संगमयुगात बौद्धिक विमानाने तिन्हीलोकी जावूया ।।८।।

सत्ययुगी देवतांना ज्ञान नसते आदि मध्य अंताचे
संगमयुगी ब्राह्मणांना ज्ञान असते तीनही काळांचे ।।९।।

सत्ययुगी देवीदेवता स्वदर्शन चक्रधारी नसतात
संगमयुगी ब्रह्मणच स्वदर्शनचक्रधारी असतात ।।१०।।

सत्ययुगात अष्टरत्न असतील विश्वाचे बादशहा
संगमयुगी ब्राह्मण आहेत बेगमपूरचे बादशहा ।।११।।

सत्ययुगात विश्वराज्य अधिकारी तेच बनतील
संगमयुगात जे कर्मेंद्रियांचे अधिकारी बनतील ।।१२।।

सत्ययुगी स्वर्गात निर्माण करावे लागत नाही भाग्य
संगम युगातच बनते २१ जन्मांचे स्वर्गीय भाग्य ।।१३।।

गोदावरी दीदींचे विचार मंथन आहे उच्च प्रतिचे
म्हणूनी त्यांनी गायन केले संगमयुगीश्रेष्ठ भाग्याचे ।।१४।।

– ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे



कल्पकल्प होणाऱ्या परमात्म अवतरणात पिताश्रींची महत्त्वपूर्ण भूमिका!

(भाग १)

ब्र. कु. उज्ज्वलाताई, पुणे

यदा यदाहि धर्मस्य ग्लानीर्भवती भारत... धर्म संस्थापनार्थाय संभवामी युगे-युगे। श्रीमद् भगवद् गीतेतील सदरहू श्लोक प्रस्तुत करण्याचा एकमात्र उद्देश हाच असावा की, ज्या ज्या वेळी भारतात अधर्माचे प्राबल्य वाढून धर्मग्लानी होते त्या त्या वेळी परमात्म्याचे अवतरण निश्चितपणे होत असते. म्हणून अवतरणाची ही अत्यंत महत्त्वपूर्ण व कल्याणकारी घटना होत असतानाच ह्या घटनेला मनुष्याने आपल्या बुद्धीच्या तिसऱ्या नेत्राद्वारे अवश्य जाणावे. हे निश्चित आहे की, प्रत्येक युगात धर्मग्लानी होत नसल्याने परमात्म्याला युगे युगे अर्थात प्रत्येक युगात अवतरित होण्याची आवश्यकता नसते. जर तो प्रत्येक युगात अवतरित होत असेल तर सत्ययुगासारखा पावन व धर्मग्लानी मुक्त असलेल्या युगातही त्याला अवतरित व्हावे लागेल. परंतु हे असंभव आहे. आत्मिक बंधुनो, विचार करा, परमात्म्याला तर पतितपावन म्हटले जाते. अर्थात त्याचे अवतरण केवळ कलियुगाच्या अंतिम चरणातच होणे यथायोग्य आहे. ह्या अंतिम चरणातच मनुष्यात्म्यांची सर्वाधिक पतित अवस्था होऊन घोर अज्ञान व अज्ञानामुळेच धर्मग्लानी निर्माण होत असते. वर्तमानसमयी केवळ धर्मग्लानीच नाही तर अतिधर्म ग्लानीची लक्षणे स्पष्ट दिसत असताना, प्रत्येक आस्तिकवादी मनुष्यात्म्याच्या मनात हा प्रश्न निर्माण व्हायला हवा की, अद्याप त्या पतित पावन परमात्म्याचे अवतरण कसे झाले नाही? **बंधुनो, ह्या ईश्वरीय विश्वविद्यालयाद्वारे हाच अनमोल संदेश देण्यात येत आहे की, सन १९३६ साली धर्मग्लानीची परिसीमा पूर्ण होताच, जन्म-मृत्यु रहित, ज्योतिस्वरुप, परमात्म्याचे अवतरण आकाशतत्वाच्या पार करोडो योजने दूर असलेल्या परमधामातून झाले आहे.**

परमात्म्याला ज्ञानसूर्य असेही म्हटले जाते. ज्याप्रमाणे भौतिक सूर्य प्रतिदिन उदित होऊन रात्रीचा अंधःकार नाहीसा करतो. तद्वतच ज्ञानसूर्य परमात्मा प्रतिकरुप उदित होऊन धर्मग्लानी, अज्ञान व अंधश्रद्धेचा अंधःकार नाहीसा करतो. अर्थात तो प्रदीर्घ कालीन रात्रीचे (द्वापर व कलियुग) प्रदीर्घ कालीन दिवसात (सत्ययुग व त्रेतायुग) परिवर्तन करतो. ह्या बेहदच्या दिवसरात्रीलाच भगवद्गीतेत ब्रह्मदेवाचा दिवस व ब्रह्मदेवाची रात्र म्हटले आहे. ही रात्र आरंभ होताच ह्या साकार सृष्टीवरील पावन आत्म्यांची पतित अवस्था होण्याची प्रक्रिया ही आरंभ होते. पतितपावन परमात्मा मात्र संपूर्ण पतित झालेल्या मनुष्यात्म्यांना पावन करीत असल्याने, ह्या लेखाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे तो ह्या मनुष्यसृष्टीची संपूर्ण पतित व जडजडीभूत अवस्था झाल्यावरच अवतरित होतो. अवतरणाच्या ह्या कालावधीला परमात्म्याने 'पुरुषोत्तम संगमयुग' असे नाव दिले आहे. म्हणून गीतेतील वरील श्लोकात संभवामी युगे युगेच्या ऐवजी 'संभवामी संगमयुगे' असे म्हणणे यथार्थ व तर्कशुद्ध आहे.

बंधुनो, परमात्म्याला स्वतःची काया (शरीर) नसल्याने तो परकाया प्रवेश करून अवतरित होतो. सदरहू श्लोकात म्हटल्याप्रमाणे तो एका सत्यधर्माची व त्याचबरोबर संपूर्ण सुखशांती असलेल्या सत्ययुगाचीही स्थापना करतो. अर्थात सत्य परमात्मा त्यालाच म्हणावयाचे जो एका सत्यधर्माची व सत्ययुगाची स्थापना

करतो. अशा कल्याणकारी सत्य परमात्म्याला जाणण्यासाठी ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्रावरील अज्ञानाचे व अंधश्रद्धेचे आवरण हटविणे आवश्यक असते. ते आवरण न हटविल्यामुळे परमात्म्याच्या अवतरणाला त्याच्या विदेही, अव्यक्त व अविनाशी स्वरुपाला कोट्यावधी ज्ञाननेत्रहीन मनुष्यात्मे जाणू शकत नाहीत. ह्याचे मुख्य कारण हेच आहे की, स्वतःला देह मानून परमात्म्यालाही देहधारी मानणे. फलस्वरुप अशा मनुष्यांचे अनुमान हेच असते की, कधी काळी स्वतः श्रीकृष्ण अथवा त्याचा आत्मा एखाद्या संत महात्म्याच्या हृदयात अवतरित होईल. भिन्न-भिन्न संतमहात्म्यांना भिन्न-भिन्न देवतांचा अवतार मानणे हे तर मनुष्यात्म्यांचे वर्षानुवर्षाचे मिथ्या अनुमान आहे.

बंधुनो, सद्विवेक व ज्ञान नेत्रांद्वारे अवतरणाचा हा नियम जाणून घ्यावा की, परमधामातून देहसहित कोणीही अवतरित होवू शकत नाही. श्रीकृष्णाचा आत्मा परमधामातून ह्या साकार सृष्टीवर अवश्य येतो. परंतु तो मातेच्या गर्भातूनच आपला दैहिक जन्म प्राप्त करीत असल्याने, ह्या प्रक्रियेला 'अवतरण' म्हणता येणार नाही. अर्थात केवळ विदेही परमात्म्याच्या परकाय प्रवेशालाच 'अवतरण' म्हणणे यथार्थ आहे. ह्यावरुन निष्कर्ष हाच निघतो की, धर्मग्लानी समयी अवतरित होण्याचा व विश्वातील सर्व मनुष्यात्म्यांसाठी गीताज्ञान प्रदान करून, राजयोगाद्वारे त्यांना पावन करण्याचा अधिकार देहधारी श्रीकृष्णाचा नसून, विदेही परमात्म्याचाच आहे. त्यानेच हे स्पष्ट केले आहे की, सतोप्रधान श्रीकृष्णाचा जन्म रजोप्रधान स्थिती असलेल्या द्वापरयुगात होत नसून, धर्मग्लानीमुक्त व सतोप्रधान स्थिती असलेल्या सत्ययुगातच होतो. जेथे केवळ मनुष्यात्मेच नव्हे तर पाच तत्त्वेही पावन असतात. वर्तमान समयी पाच मनोविकारांनी व्याप्त असलेल्या ह्या अपवित्र नरकीय भूमीवर त्याची सावलीही पडू शकत नाही. श्रीकृष्ण संपूर्ण पावन अवश्य होता, परंतु तो पतितपावन मात्र नव्हता. बंधुनो, मनुष्यात्म्यांच्या वरील अनुमानाप्रमाणे श्रीकृष्ण कधीतरी अवतरित होईल ही तर त्यांची मृगतृष्णाच आहे. तद्वतच धर्मस्थापक मनुष्यात्मे, ऋषी मुनी, संतमहात्मे द्वापर कलियुगात आपले जन्म प्राप्त करून तत्कालीन समाजाला आध्यात्मिक मार्गदर्शन अवश्य करतात. परंतु एकमात्र विदेही परमात्म्याशिवाय अन्य कोणत्याही देहधारी आत्म्यात इतके बळ नाही की, विषय विकारांच्या कारणे २५०० वर्षात (रौरव) नर्क झालेल्या ह्या पतित मनुष्यसृष्टीला, पाच तत्त्वांसहित पावन करून एका सत्यधर्माची तसेच संपूर्ण अहिंसक व सुखशांती संपन्न अशा स्वर्गीय नवयुगाची स्थापना करेल. बंधुनो, कोण, कधी व कोणत्या रुपात अवतार घेतो ह्याविषयी तर विस्तृत स्वरुपात विवेकशून्य असे घोर अज्ञान कित्येक शास्त्रात आहे. त्यात मच्छ, कच्छ, वराह इत्यादि अवतारांचेही वर्णन आहे. चिंतन करावे की, अशा वाणीरहित कनिष्ठ प्राण्यांच्याद्वारे परमात्मा मनुष्यात्म्यांचा उद्धार कसा करु शकेल? अशाप्रकारे अवतार अथवा अवतरणाविषयी भिन्न-भिन्न कल्पना व कथा निर्माण झाल्याने वर्तमानात होणारे वास्तविक परमात्म अवतरण हे मनुष्यात्म्यांसाठी अनाकलनीय झाले आहे. अर्थात ह्या अवतरणाचे महत्त्व कोणाला समजेल व ह्या रुद्रज्ञान यज्ञात कोण किती दिवस टिकेल, हे सांगणे मात्र कठीण आहे.

अवतरणाविषयीचे अज्ञान दूर व्हावे म्हणून भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायातील अकराव्या श्लोकात महावाक्य आहे की, 'माझ्या सर्वश्रेष्ठ ज्योति स्वरुपाला न जाणणारे लोक मजला साधारण देहधारी मनुष्य समजून माझी अवज्ञा करतात'. हा श्लोक हेच स्पष्ट करतो की, असे हे स्वरुप श्रीकृष्णाचे नव्हे! त्याला तर आबालवृद्ध सहजपणे जाणतात. परंतु परमात्म्याला जाणणे इतके सहज नाही. भगवद्गीतेतील ह्या महत्त्वपूर्ण श्लोकाचा धागा पकडल्यास, हाच धागा तुम्हाला परमात्म अवतरणाविषयीच्या संपूर्ण सत्यापर्यंत घेऊन जाईल. बंधुनो, जर निराकार परमात्मा साकार रुप धारण करण्यासाठी साधारण मनुष्य तनाचा आधार घेत असेल तर त्याचे साकार

रुप हे केवळ साधारण तनाद्वारेच प्रगट होत असणार हे निश्चित. **विश्वातील अत्यंत महत्वपूर्ण व कल्याणकारी समाचार हाच आहे की अव्यक्त परमात्मा आपल्या परमधामातून ह्या साकार सृष्टीवर अशाच एका वृद्ध तनाद्वारे अवतरित होऊन व्यक्त अर्थात प्रगट झाला आहे. ज्या साधारण मनुष्य तनात अर्थात शरीररथात स्वतः भाग्यविधाताच प्रवेश करून मानव मात्राचे सुखशांती संपन्न असे दैवी भाग्य प्राप्त करवून देतो म्हणून त्याने त्या शरीर रथाला 'भाग्यशाली रथ' असे म्हटले आहे. हा शरीर रथ ज्या साधारण मनुष्यात्म्याचा असतो. त्याचे नाव असते 'दादा लेखराज', त्यांचे पूर्ण नाव होते 'लेखराज खूबचंदजी कृपलानी'** बंधुनो, असा भाग्यशाली रथ ना श्रीराम-श्रीकृष्णाचा, ना कोणा धर्मात्म्याचा, ना एखाद्या संत महात्म्याचा आहे. ह्या भाग्यशाली रथाद्वारेच दादा लेखराज हे विश्वातील नं.१ भाग्यशाली आत्मा कसे बनले, ह्याची अद्भूत कहाणी आपल्याला जाणून घ्यावयाची आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात सिंध हैद्राबादमध्ये दादा लेखराज हे सामाजिक प्रतिष्ठा लाभलेले, हिऱ्यांचे धनाढ्य व दानशूर व्यापारी होते. तसेच ते श्री विष्णूचे परमभक्तही होते. वयाच्या साठीजवळ आले असताना त्यांना भिन्न-भिन्न प्रकारचे साक्षात्कार होऊ लागले. त्यांना एक साक्षात्कार झाला तो कलियुगी मनुष्यसृष्टीच्या महाभयंकर महाविनाशाचा! ह्या विनाशात त्यांनी पाहिले की, भारतात रक्तरंजित गृह युद्धे, जातीय दंगली व प्राकृतिक आपदांच्या द्वारे विनाश होत आहे. तर अन्य देशात महाभयंकर अशा अणुयुद्धाद्वारे करोडो मनुष्य मृत्युमुखी पडत आहेत. त्यांना आणखी साक्षात्कार झाला तो शंख, चक्र, गदा व कमळ धारण केलेल्या चतुर्भुज श्री विष्णूचा! विस्मित नेत्रांनी हा साक्षात्कार पहात असतानाच, अकस्मात श्री विष्णूच्या मुखकमलाद्वारे दिव्य वाणी प्रगटली 'अहम् चतुर्भुज विष्णू तत्त्वम्' ह्या दोन साक्षात्कारावरच दादा अधिक चिंतन करू लागले. चिंतन करीत असताना त्यांना आपल्या दुकानातील हिऱ्यांच्या जागी कोळसे दिसू लागले आणि त्यांना बेहदचे वैराग्य प्राप्त झाले. व्यवसायात त्यांचे मन रमेनासे झाले. त्यांनी अंतिम निर्णय हाच घेतला की, हा हिऱ्यांचा व्यवसाय समाप्त करावयाचा.

सन १९३६ मध्ये एके दिवशी विश्वातील सर्वात महान व कल्याणकारी घटना घडली ती अशी. दादा लेखराज ह्यांनी आपल्या निवासस्थानी त्यांच्या गुरुंचे प्रवचन आयोजित केले होते. प्रवचन चालू असताना कोणती तरी अद्भूत शक्ती त्यांना तेथून उठण्याची प्रेरणा देत होती. त्या शक्तीने त्यांना त्यांच्या खोलीत जाण्यासाठी विवश केले. त्यांच्या गुरुंनाही आश्चर्य वाटले की, ह्यापूर्वी दादा माझे प्रवचन चालू असताना कधीच उठून गेले नव्हते. थोड्या वेळाने दादांना पहाण्यासाठी त्यांची सून खोलीचे लोटलेले दार उघडून त्यांच्या खोलीत गेली आणि तिजला अभूतपूर्व दृश्य दिसले. दादांची खोली लाल सोनेरी रंग असलेल्या अद्भूत प्रकाशाने भरून गेली होती. त्यांचे नेत्रही एखाद्या दीपाप्रमाणे चमकत होते. दादांची असे अलौकिक व दिव्यरुप ह्यापूर्वी त्यांच्या सुनेने कधीच पाहिले नव्हते. त्याचवेळी दादांच्या मुखातून धीर गंभीर स्वर असलेली वाणी प्रगट झाली की, 'निजानंद स्वरुपम् शिवोऽहम् शिवोऽहम्; ज्ञान स्वरुपम् शिवोऽहम् शिवोऽ हम्, प्रकाश स्वरुपम् शिवोऽ हम् शिवोऽहम्। हे समस्त धर्मातील आत्म्यांनो, हेच आपल्या पारलौकिक ज्योतिस्वरुप पित्याचे परकाया प्रवेश करून विश्वकल्याणार्थ झालेले दिव्य अवतरण होय! परमधामातून साकार सृष्टीवर झालेल्या ह्या प्रथम अवतरणात परमात्म्याने स्वतःच्या स्वरुपाविषयी उच्चारलेली तीन महावाक्ये अर्थात गीताज्ञानदात्याने मूळ भगवद् गीतेचा केलेला शुभारंभ होय! आरंभीची ही तीन अनमोल महावाक्य श्रवण करण्याचे परमभाग्य केवळ दादा लेखराज व त्यांच्या सुनेलाच लाभले होते. बंधुनो, सीमित दुष्टीकोन असलेली मनुष्यनिर्मित भगवद् गीता कृष्णार्जुनाच्या एका जन्मापुरती दर्शविली जाते. तर परमात्मा गीताज्ञान प्रदान करताना श्रीकृष्णाच्या एका कल्पातील ८४ जन्मांची वास्तविकता प्रस्तुत करून, एक

अभुतपूर्व गुह्यरहस्य प्रगट करतो की, श्रीकृष्णाचाच आत्मा आपल्या अंतिम जन्मात ज्ञान अर्जन करणारा भगवद्गीतेचा प्रथम अर्जुन बनतो. केवळ ह्याच गीतेद्वारे सृष्टीच्या आदि मध्य व अंताचे ज्ञान प्राप्त झाल्याने मनुष्यात्मा त्रिकाल ज्ञानी बनतो. केवळ ह्याच गीतेद्वारे मनुष्याला पुनः देवत्वपद प्राप्त होते. ह्याच गीतेद्वारे सर्व आत्म्यांना त्यांच्या अंतिम स्थितीनुसार मुक्ती व जीवनमुक्ती प्राप्त होते. ज्यावेळी ह्या अमूल्य गीतेचे व गीताज्ञानदाता परमपिता परमात्म्याचे असाधारण महत्त्व समस्त विश्वाला समजेल अर्थात **ज्यावेळी परमात्म्याची प्रत्यक्षता होऊन जगातील सर्व मनुष्यात्म्यांना समजेल की, परमपिता परमात्मा ह्या साकार सृष्टीवर आलेला आहे. त्यावेळी ह्या साकार जगतातील सर्व मनुष्यात्मे आनंदाने नाचू लागतील.** परमात्म्याच्या प्रत्यक्षतेच्या पश्चात ह्या जगातील अलौकिक दृश्य कसे असेल ह्याची कल्पना एका बेहदच्या गीताद्वारे गीतकाराने २५ वर्षापूर्वीच करून ठेवली आहे, ते गीत पुढीलप्रमाणे 'खुश होके गा रहा है, अब ये जहान सारा। अपना परमपिता शिव, कितना है प्यारा प्यारा। खुश होके गा रहा है।'

बंधुनो, परमात्म्याचा अवतरित होण्याचा मुख्य उद्देश हाच आहे की, भारतात एक धर्म, एक भाषा, असलेली सत्ययुगी स्वर्गीय सृष्टी स्थापन करणे. त्यासाठी त्या सत्ययुगी स्वर्गीय सृष्टीचा तिसरा साक्षात्कार करवून परमात्म्याने पिताश्रींना सांगितले की, 'हे वत्स तुझ्याद्वारे अशी स्वर्गीय सृष्टी मी स्थापन करणार आहे त्या स्वर्गीय सृष्टीत भारताचा प्रथम विश्वमहाराजन श्री नारायण हे सर्वोच्च पद प्राप्त करून तुलाच आपल्या दैवी प्रजेची पालना करावयाची आहे. अर्थात ह्या पुरुषोत्तम संगम युगावर श्रीमताच्या आधारे तुजला मी नारायणाप्रमाणे सोळा कला संपूर्ण पवित्र बनावयाचे आहे. तुला आपल्या आदि स्वरुपाची विस्मृति झाली आहे. आता तुजला पुनः स्मृतिस्वरुप बनण्याचा पुरुषार्थ करावयाचा आहे. त्यासाठी अत्यंत परिणामकारक व जन्मजन्मांतराचे कल्याण करणारे महावाक्य परमात्म्याने उच्चारले की, '**आपही पावन पूज्य थे और आपही पतित पुजारी बने है।' अर्थात 'तूच पावन व पूज्य होतास परंतु तूच जन्म-मृत्युच्या चक्रात येवून पतित पुजारी झाला आहेस. तुलाच पुरुषार्थ करून ह्या ८४ व्या अंतिम व अलौकिक जन्मात श्री नारायण पद प्राप्त करावयाचे आहे. हे वत्स, तुजला ह्या कल्पातच नव्हे तर प्रत्येक कल्पात ८४ जन्म प्राप्त होतात**'. त्यातील मुख्य चार जन्म परमात्म्याने स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे- सत्ययुगातील प्रथम महाराजा श्री नारायण, द्वापर युगात राजा विक्रमादित्य, कलियुगात दादा लेखराज तर संगमयुगावरील हा अलौकिक जन्म प्रजापिता ब्रह्मा. अशाप्रकारे ८४ जन्मांचे गुह्य रहस्य समजल्यानंतर दादांना 'अहम् चतुर्भुज विष्णू तत्त्वम्' ह्या अद्वितीय साक्षात्काराचा अर्थ उमगला.

नूतन स्वर्गीय सृष्टीचा साक्षात्कार करवून परमात्म्याने दादा लेखराज ह्यांना 'प्रजापिता ब्रह्मा' हे अलौकिक व कर्तव्यवाचक नाव प्रदान केले. बंधुनो, ब्रह्माची ह्या साकार सृष्टीवर भूमिका त्याचेळी असते ज्यावेळी परमात्म्याला त्याच्याद्वारे नूतन दैवी सृष्टीची स्थापना करावयाची असते. स्थापनेच्या ह्या कार्यात परमात्म्याला सर्वाधिक सहयोग ब्रह्माद्वारेच प्राप्त होतो. त्याचे प्रतिक म्हणून शिवमंदिराजवळच नंदिगणाची प्रतिष्ठापना केली जाते. ब्रह्माचे प्रतिक असलेल्या ह्या नंदिगणाविषयी, ब्रह्माविषयी तद्वतच आत्मा परमात्म्याविषयी जे काही समाजात अज्ञान होते ते अज्ञान दूर होऊन, तत्कालीन समाजाला ज्ञान प्राप्त व्हावे तसेच त्याने राजयोगाद्वारे पावन स्थिती प्राप्त करावी म्हणून ब्रह्माबाबांनी परमात्म्याच्या मार्गदर्शनानुसार सत्संगाची स्थापना केली. अशाप्रकारे एके काळी हिऱ्यांचा व्यवसाय करणारे दादा लेखराज ह्यांनी 'प्रजापिता ब्रह्मा' हे अलौकिक नाव प्राप्त करून, आत्मारुपी हिऱ्यांना पावनतेचे पैलू पाडण्याचा, विश्वकल्याणी व्यवसाय आरंभ केला. ह्या सत्संगात ब्रह्मावत्सांना आत्मस्वरुपाची जाणीव व निश्चय व्हावा म्हणून उच्च आवाजात 'ओम्चा' ध्वनी केला जात असे.

(क्रमशः)

***

अंतिम समयाची तयारी

ब्र. कु. बालूभाई, शांतिवन (आबू रोड)

एक मूर्तिकार खूप सुंदर मूर्ती बनवित असे. एके दिवशी त्याच्या मनात विचार आला की आपणच आपली हुबेहुब मूर्ती तयार करायची, जी एकदम सजीव प्रतीत होईल. त्या मूर्तीमुळे आपण मृत्यूलाही चुकवू शकू. त्याप्रमाणे त्या मूर्तिकाराने अशा १० प्रतिमूर्ती बनवल्या. शेवटी जेव्हा त्याची मृत्यूची वेळ आली तेव्हा यमदूत त्याला घ्यायला आला तेव्हा त्यालाही प्रश्न पडला की यातील सजीव मूर्तिकार तो कुठला? परंतु यमदूताला मानवी स्वभावाची ओळख होती. त्याने मूतिकाराचे मोठे कौतुक केले. तो म्हणाला, 'हे मानवा, तू मलाही चकित केले आहेस. तुला ओळखणे मलाही अवघड झाले आहे. परंतु या मूर्तीमध्ये मला एक कमी जाणवली. ती जर तू भरून काढली असती तर फार बरे झाले असते. असे ऐकताच तो मूर्तिकार म्हणाला, 'कमी आणि मी तयार केलेल्या मूर्तीत? हे कधीच शक्य नाही.' लगेचच यमदूताने त्याला ओळखले आणि त्याला घेऊन गेला. जातांना यमदूत त्या मूर्तिकाराला म्हणाला की, 'मनुष्यातील 'मीपणा' हा शेवटपर्यंत नष्ट होत नाही. म्हणूनच मी तूला ओळखू शकलो'. या अनुषंगाने समर्थ रामदासांचा पुढील श्लोक अतिशय उद्बोधक असा आहे –

मना पाहता सत्य हे मृत्युभूमी।
जिता बोलती सर्वही जीव मी मी।
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती।

(भावार्थ : हे मना, ही मृत्युलोकाची वस्ती अशाश्वत आहे. जिवंतपणी मात्र जो तो आढ्यतेने 'मी मी' करीत असतो. आपण चिरंजीव आहोत, असे समजून संसारात दंग होऊन राहतो. परंतु काळाची उडी पडताच, एकदम सर्व येथेच टाकून प्रत्येकाला जावे लागते.)

स्थूल यात्रेसाठी जातांना आवश्यक त्या सर्व वस्तू आपण बरोबर घेत असतो. उदा. हिवाळा असेल तर शाल, स्वेटर, मफलर इत्यादी गोष्टींचा प्रबंध करतो. पावसाळा असेल तर छत्री, रेनकोट इत्यादी... परंतु सूक्ष्म जगाकडे जातांना आपल्याला काय तयारी केली पहिजे, याकडे मात्र आपले तितकेसे लक्ष नसते. म्हणूनच त्रिकालदर्शी शिवबाबा आपल्याला वारंवार समजावून सांगातात की, 'अंतिम समयाची तयारी तुम्ही आतापासून केली तरच माझ्याजवळ परमधामध्ये सुखरुप पोहचू शकाल. तर मग त्यासाठी कोणती तयारी करणे गरजेचे आहे, हे आपण पाहू या.

१) आपला पेटी–बिस्तरा सदैव तयार ठेवा –

प्रवासाला निघतांना असे आपण आवश्यक सामानाने भरलेली पेटी तयार ठेवतो. तद्वत मृत्युनंतर पुढच्या प्रवासासाठी आपल्याबरोबर दैवी गुण व दैवी संस्कारांची पेटी सदैव तयार ठेवली पाहिजे. कारण मृत्युनंतर या जगातील कुठलीही स्थूल वस्तू आपल्यासोबत येत नाही. आपल्या कर्माचा लेखाजोखा व आपले संस्कार हेच सोबत येतात. म्हणूनच आता आपल्याला निरंतर राजयोगाच्या अभ्यासाने कर्मातील बनणे आवश्यक आहे. तसेच श्रेष्ठ संस्कार धारण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा पेटी –बिस्तरा तयार ठेवणे अर्थात एवररेडी बनणे होय.

२) अंतिम पेपर हा केवळ १ सेकंदाचा व अचानक होईल –

मनुष्याला आज जगाविषयी बरीच माहिती आहे. परंतु स्वतःच्या मृत्युची तारीख मात्र कोणालाच माहित नाही. म्हणूनच पुढच्या क्षणी काय होईल, हे मात्र काळाच्या पोटात दडलेले आहे. म्हणूनच भूतकाळाबद्दल पश्चाताप करू नका. तसेच भविष्याची देखील चिंता करू नका. केवळ वर्तमानात श्रेष्ठ बनवा म्हणजे भविष्य निश्चितच श्रेष्ठ असेल.

अंतिम पेपरचा काळ १ सेकंदाचा असेल व त्यातील प्रश्न असेल 'नष्टोमोहा स्मृती स्वरुप बनणे' अंतिम पेपरमध्ये 'पास विथ ऑनर' होण्यासाठी आपण सर्व ब्रह्मावत्स तयारी करीत आहोत, जर आतापासून आपण 'नष्टोमोहा' असू, 'माझे-माझे' समाप्त झाले असेल तरच आपल्याला तो पेपर सोपा जाईल. परंतु यासाठी बऱ्याच काळचा अभ्यास हवा. तो असेल तरच आपल्याला अंतिम समयी मदत मिळेल म्हणून अंतिम पेपरची तयारी आजपासून नाही तर आतापासूनच करा.

३) बहाणेबाजी टाळली नाही तर अंतिम बाजी गमावून बसू –

मनुष्याची सर्वात मोठी कमजोरी म्हणजे बहाणेबाजी करणे अर्थात कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी विभिन्न कारणे देऊन, ती गोष्ट टाळणे वा टाळाटाळ करणे. परंतु संगमयुगी ब्राह्मण जीवनात हीच गोष्ट आपल्याला भविष्य श्रेष्ठ प्रालब्ध प्राप्तीपासून वंचित करेल. म्हणूनच उद्या जी गोष्ट करायचे ठरवले असेल, ती आजच करा. कारण केवळ वर्तमान आपल्या हातात आहे. आजचे काम कधीही उद्यावर टाकू नका. आपणा सर्वांना मेंढपाळाची ती गोष्ट माहितच असेल. मेंढपाळाला लोकांनी सांगितले की, तू तुझ्या मेंढीला सुरक्षित ठिकाणी बांध. वाघ कधीही येईल आणि तुझी मेंढी खाऊन टाकील. परंतु बऱ्याच वेळा हे ऐकून-ऐकून मेंढपाळाचा त्यावरचा विश्वास उडाला व तो गाफिल राहिला. अचानक एके दिवशी खरंच वाघ आला व मेंढी खाऊन गेला. या सृष्टीचा महाभारी विनाश देखील असाच अचानक होणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने 'एवररेडी' असणे आवश्यक आहे.

४) योग युक्त ब्रह्मावत्सच विनाश पाहू शकतील –

योगेश्वर शिवबाबांनी ज्ञानमुरलीतून अनेक वेळा समजावून सांगितले आहे की भारतामध्ये गृहयुद्ध (सिव्हील वार) व प्राकृतिक आपत्ती यांच्याद्वारे विनाश होईल. योगयुक्त मुलांना बाबा वतनमध्ये 'सुबीरस' पाजतील. परंतु त्यासाठी आपली अवस्था अचल-अडोल असली पाहिजे. कारण एखाद्याचे ऑपरेशन जरी बघायचे म्हटले तरी बऱ्याच लोकांना भीती वाटते किंवा एखाद्याचा अपघाती मृत्यु पाहिला तरी कुणाला हृदय विकाराचा झटका येतो. मग शेवटी तर ह्या गोष्टी फार मोठ्या प्रमाणात होणार आहेत. आपलेच जवळचे नातेवाईक जेव्हा मृत्युमुखी पडतील त्यावेळी आपली खरी परीक्षा होईल. म्हणूनच शिवबाबा रोज हा पाठ पक्का करून घेतात की, मुलांनो, देहसहित देहाचे सर्व संबंधांना विसरून, स्वतःला आत्मा समजा.

५) हाहाःकार झाल्यानंतर जयजयकार होईल –

अंतिम समयी विश्वामध्ये चोहीकडे विनाशाची आग असेल, देह व देहाच्या संबंधींना सोडण्याची आग, पश्चातापाची आग, वस्तू-वैभव, किमती सामानाची आग-असा भिन्न-भिन्न प्रकारच्या आगीमध्ये संसार जळत असतांना आपली स्थिती कशी असेल याविषयी विचार केला तर मनाची खात्री पटेल की ही गोष्ट फारच कठीण आहे. पिताश्री ब्रह्माबाबांना सुद्धा सुरुवातीला जेव्हा विनाशाचा साक्षात्कार झाला तेव्हा त्यांना देखील तो पाहवला नव्हता. अशा या महाभारी विनाशानंतर विश्वात सर्वत्र शांतता होईल आणि त्यामधून शिवशक्ती पांडव सेनेचा जयजयकार होईल.

६) प्राकृतिक आपत्ती व सामुहिक मृत्यु –

पंचतत्त्वाचे परिवर्तन ही खूप मोठी प्रक्रिया आहे. साधारण मनुष्याच्या बुद्धीच्या पलीकडचा हा खेळ आहे. सन १९४५ मध्ये हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकण्यात आला. त्याचा इतका भयानक परिणाम झाला

होता की सन १९७२ पर्यंत त्या जमिनीवर कुठलेही उपज होत नव्हते. आता तर त्याहून कितीतरी पटीने प्रबळ असे हायड्रोजन बॉम्ब निर्मित केले आहेत. परंतु भारतामध्ये ह्यांचा प्रयोग न होता ते विदेशांच्या विनाशाला कारणीभूत ठरतील. महाभारी विनाशानंतर ही भारतभूमी पुन्हा स्वर्गभूमी बनेल.

हायड्रोजन बॉम्ब तसेच अन्य प्रकारच्या भयानक शस्त्रांच्या वापरामुळे खूप मोठ्या प्रमाणावर लोक, मृत्युमुखी पडतील. परिणामतः खूप काही आत्मे भटकत राहातील व लोकांना त्रास देतील. कारण त्यांना स्वतःचे शरीर नसल्यामुळे, दुसऱ्यांच्या शरीराचा आधार घेण्याचा ते प्रयत्न करतील अशावेळी जे आत्मे शक्तीशाली आहेत, परमात्म छत्रछायेखाली आहेत, तेच यापासून सुरक्षित राहू शकतील.

७) निराधार स्थितीचा अनुभव होईल –

मनुष्याने आपल्या जीवनात जे काही आधार बनवून ठेवले असतील, ते सर्व आधार तुटत जातील व मनुष्याला निराधार स्थितीचा अनुभव होईल. विमा कंपन्या नष्ट होतील. दिवसेंदिवस अर्थव्यवस्था ढासळत जाईल. प्रदुषणामुळे पाणी दुषित होईल. पाणी असेल परंतु ते पिण्या योग्य नसेल. एखाद्याने अगदी आपल्या हातातील सोन्याची अंगठी जरी दिली तरी ग्लासभर पाणी प्यायला मिळणार नाही. खाद्य पदार्थ असतील परंतु ते खाण्या योग्य नसतील. अशावेळी ब्रह्मावत्सांना प्रत्येक पावलावर शिवबाबांच्या मदतीचा अनुभव होईल. याचेच गायन आहे – 'जिसको राखे साई, उसे मार सके न कोई।' ज्यांच्या बुद्धीत एक शिवबाबाची स्मृती असेल, त्यांना शिवबाबांकडून वेळोवेळी संदेश प्राप्त होतील व मदतीचा अनुभव होईल. ज्या ब्रह्मावत्सांनी आपल्या जीवनात अनासक्त भाव ठेवला, त्यांना शेवटी कष्ट होणार नाहीत. परंतु ज्यांच्यामध्ये कोणतीही कमी वा कमजोरी असेल तर ती त्यांच्या विनाशासाठी कारण बनेल.

८) अंतिम समयाचा अभ्यास देखील पिताश्रींनी यज्ञवत्सांना करवला –

ज्यावेळी यज्ञामध्ये बेगरी पार्ट चालू होता. त्यावेळी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. परंतु शिवबाबांनी आपल्या मुलांना कधीही उपाशी ठेवले नाही. ज्या ईश्वराला लाखो भक्तगण रोज नैवेद्य दाखवतात, तो ईश्वर आपल्या मुलांना उपाशी कसे राहू देईल? दादीजींनी अनुभव सांगितला होता की एकदा यज्ञात सकाळच्या नाश्त्यासाठी काहीही शिल्लक नसल्याचे, भंडारीने (भोली दादींनी) पिताश्रींना येऊन सांगितले. त्यावेळी पिताश्रींनी यशवत्सांना सांगितले की, बाबा उद्या नाश्त्यासाठी तुम्हाला खूप चविष्ट फळे खाऊ घालणार आहे. मुरली क्लासनंतर बाबा सर्व मुलांना टेकडीवर घेऊन गेले. बाबांनी सर्वांना १ तास पिकनिक करायला सांगितले. त्यावेळी पहाडीवर करवंदे खूप लागलेले होते. सर्वांनी अगदी पोट भरून करवंदे खाल्ली. मम्मा-बाबांना सुद्धा खूप गोड, चविष्ट अशी करवंदे खायला दिली. त्यानंतर पिताश्रींनी सर्वांना विचारले की आता नाश्ता कोणाला पाहिजे का? तेव्हा सर्वांनी नकार दिला. अशाप्रकारे जादूगर शिवबाबांनी आपल्या मुलांना कोणत्याही गोष्टीची कधीही उणीव भासू दिली नाही.

शिवबाबांनी हे ही सांगितले आहे की, ''बच्चे, अंतिम समय में भी जो बच्चे मेरी याद में होंगे, बाबा उन्हे वतन में बुलाकर भी खिला देगा लेकिन बच्चों को भूखा नही रखेगा।''

९) जीवनात कोणतीही उणीव वा कमतरता रहायला नको –

एकदा एका भाईने आपला अनुभव सांगितला की, ''मला जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. परंतु मी कधी घाबरलो नाही. पण एकदा विमानातून जात असतांना रात्रीचे ११ वाजले होते. विमानामध्ये मी पुढच्या लाइनमध्ये तिसऱ्या सीटवर बसलो होतो. अचानक पुढे केबिनमध्ये आगीची ठिणगी दिसली. मी एअर होस्टेसला विचारले की काय झाले? विमानातील प्रवासी झोपले होते. तिच्या चेहऱ्यावरची काळजी पाहून मी तिला पुन्हा विचारले. तेव्हा ती म्हणाली, 'एअर प्रॉब्लेम झाला

आहे.' हे ऐकल्यावर मनात विचार आला की, जीवनात शेवटचा क्षण कधीही येऊ शकतो. तेव्हा मनाला पटले की अहंकारामुळे आपण संबंधात कटुता निर्माण करतो, हे किती मूर्खपणाचे आहे. मी आता जर मेलो तर माझ्या जीवनात नक्कीच कमतरता राहिल. ईश्वराने मला हे जीवन कशासाठी दिले होते व मी मात्र कसा वागलो. असे अनेक प्रश्न मनात येऊ लागले.

त्या घटनेनंतर मी एक नवीन धडा शिकलो. कोणाविषयी कधी वैरभाव ठेवायचा नाही. जितके होईल तितके पुण्य जमा करायचे. सर्वांशी प्रेमाने वागायचे. जीवनाचे जे लक्ष्य निर्धारित केले आहे, ते लवकरात लवकर गाठायचे म्हणजे शरीर सोडतांना कुठलीही अपूर्णता वाटता कामा नये. जीवन इतके भरभरून जगायचे की आज जरी ईश्वराने बोलावले तरी अगदी आनंदाने आपली जाण्याची तयारी असली पाहिजे.

१०) सर्वांप्रति दयाभाव व क्षमाभाव बाळगणे आवश्यक –

आपण जाणतो की सर्व आत्मे एक परमात्मा शिव पित्याची मुले आहेत. त्यामुळे विश्व एक परिवार आहे. त्याचबरोबर या सृष्टिनाटकात प्रत्येक आत्मा आपली निर्धारित भूमिका बजावित आहे. त्यामुळे सर्व आत्मे निर्दोष आहेत हे अंतिम सत्य आपण जाणतो. म्हणूनच सर्व आत्म्यांविषयी आपल्या मनात सदैव दयाभाव व क्षमाभाव असला पाहिजे. एखादा आत्मा आपल्याशी कसाही वागत असला तरी तो ड्रामा अनुसार त्याची निर्धारित भूमिका बजावत आहे; ही भावना मनात असली पाहिजे.

११) समय परिवर्तनाच्या अगोदर आपले संस्कार परिवर्तन करा अन्यथा समय ते परिवर्तन करेल –

अंतिम समयाची तयारी करतांना प्रामुख्याने आपल्यातील विकारी संस्कारांचा अंश जो अजूनही शिल्लक आहे, तो योगाग्नीने भस्म करणे गरजेचे आहे. कारण तो जर तसाच राहिला तर अंतिम समयी तोच पेपर आपल्याला येईल; ज्यात आपण पास होऊ शकणार नाही. म्हणूनच आपल्या अंतिम स्थितीचे गायन आहे – 'निराकारी, निर्विकारी व निरहंकारी'. त्यामुळे आपले संस्कार परिवर्तन करा. ते ब्रह्माबापसमान बनवा. आत्मा शरीर सोडल्या नंतर फक्त संस्कारच आपल्या बरोबर घेऊन जात असतो व त्या आधारेच त्याला भविष्य प्रालब्ध प्राप्त होत असते. म्हणूनच अंतिम समय येण्या अगोदरच त्याची तयारी लगेचच, या क्षणापासून करणे, परम हितकारी आहे.

***

मधुबन पावन धरती

प्रेम, शांती, पवित्रतेची, मधुबन पावन धरती।
येथे येई प्रचिती, शिवपित्याच्या अवतरणाची।।धृ।।
पिताश्री ब्रह्माबाबांसह, ज्या बंधने तोडून आल्या।
योग–तपस्या करूनी पावन, त्या राजयोगिनी झाल्या।
जगतामधल्या मानवास त्या, विश्वासाने वदती।
येथे येई प्रचिती, शिवपित्याच्या अवतरणाची ।।१।।
पतितात्म्यांचे हॉस्पिटल हे, परमपिता शिव सर्जन।
युगा–युगाच्या पतितात्म्यांनो, शिवास व्हा समर्पण।
श्रीमताचे पथ्य पाळता, आत्मे पावन होती।
येथे येई प्रचिती, शिवपित्याच्या अवतरणाची ।।२।।
सत्ययुगातील आत्मेच सारे, झाले आज विकारी।
त्या पतितांना शिव हे निश्चित, करिती निर्विकारी।
पुण्यात्म्यांना दैवी पदांचे, आश्वासन शिव देती।
येथे येई प्रचिती, शिवपित्याच्या अवतरणाची।।३।।

(संदर्भ : ब्र. कु. गौतम सुत्रावे यांनी रचित 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची')

(ब्रह्मावत्सांकरिता)

सफल करा व सफलतामूर्त बना

ब्र. कु. राजूभाई, शांतिवन, आबू रोड

आपल्या सर्व ब्रह्मावत्सांच्या मनात अनहद नाद घुमत असतो– बाबा, बाबा, बाबा––आपले सहज योगी जीवन आहे. आपला राजयोग सर्वश्रेष्ठ योग आहे. राजयोगाचा अर्थ आहे की श्रेष्ठ प्राप्तींचा अनुभव करणे, श्रेष्ठ संकल्पामध्ये स्थित होणे व प्रभुमिलन करणे, परमात्म शक्ती आणि वरदान प्राप्त करणे. योगात जर श्रेष्ठ चिंतन असेल तर सुस्ती येणार नाही. योग अर्थात मनाची यात्रा होय. कित्येकांना योगाचा अर्थ असा वाटतो की, संकल्प शांत करणे. परंतु संकल्प शांत केल्याने झोप येऊ शकते. वास्तविक संगमयुग हे कमाई करण्याचे युग आहे. त्यासाठी सदैव स्वमानात स्थित रहा.

मी पवित्र आत्मा आहे. पवित्रतेचा सूर्य परमात्म्याच्या छत्रछायेमध्ये आहे. त्याच्या पवित्र किरणांचा अनुभव करीत आहे. मी शिवबाबांची अति प्रिय संतान आहे. त्याचबरोबर अमृतवेळेपासून रात्रीपर्यंत पुढील पाच स्वमानांचा अभ्यास करा.

१) मी आत्मा मस्तकमणी आहे. मणी अमूल्य असतो. कधी भृकुटीमध्ये बसून अनुभव करा. मणीला पहा. त्याची चमक पहा. तर कधी शिवबाबांच्या जवळ जाऊन बाबांच्या मणीबरोबर एकत्रित (Combined) होऊन बसा. श्रेष्ठ चिंतन करा की बाबांनी मला दृष्टीद्वारे प्रकाश देण्याची सेवा दिली आहे. अशी दृष्टी द्या की समोरच्या आत्म्याचे कल्याण होईल.

२) मी आत्मा शिवबाबांच्या हृदय सिंहासनावर विराजमान आहे. बाबांनी आपले स्वतःचे हृदय सिंहासन मला दिले आहे. मी बाबांचे हृदयसिंहासन जिंकले आहे. खूप प्रिय लवलीन अशी मुलेच बाबांच्या हृदयात राहतात. दिलाराम एक बाबा आहे. ज्यांनी बाबांवर अतोनात प्रेम केले आहे. जे एकव्रता राहिले आहेत, ज्यांनी बाबांशी सर्व संबंध जोडले आहेत; तीच बाबांची परमप्रिय मुले आहेत.

३) मी 'नूरेरत्न' आहे. माझ्या नयनी बाबाच राहतात. तसेच मी आत्मा बाबांच्या नयनी सामावून गेलो आहे. शिवबाबा सांगतात की मुलांनो, तुम्ही संपूर्ण विश्वाचे नूर अर्थात प्रकाश आहात. त्यामुळे तुमचे नयन कधी झुकणार नाहीत. बंद होणार नाहीत.

४) मी आत्मा शिवबाबांच्या उजवा हात (राइट हँड) आहे. प्रत्येक कर्मांमध्ये उजव्या हाताचे महत्त्व आहे. कुठलेही शुभ कार्य, मेहनतीचे कार्य उजव्या हातानेच केले जाते. त्यामुळे सदैव ही स्मृती ठेवा की मी बाबांचा उजवा हात आहे. उजवा हात म्हणजे सदैव 'हा जी' करणारा. बाबांचा इशारा मिळाला किंवा निमित्त आत्म्याचा इशारा मिळाला की सदैव 'हा जी'. कोणत्याही कार्याला होय म्हणजे. कोणतेही कारण न सांगता, सदैव उत्साहाने सेवा करणारा, मी बाबांचा नंबर वन मुलगा आहे.

५) मी शिवबाबांशी सदैव एकत्रित (Combined) आत्मा (शिवशक्ती) आहे. शिवाबरोबर शक्ती एकत्र आहे. पांडव (भाई) पांडवपती बरोबर एकत्र आहे. बाबांना आम्ही आमच्यापासून वेगळं करुच शकत नाही. वेगळं केलं तर एकटं पडू. संगमयुगात हे श्रेष्ठ भाग्य मिळाले आहे की आपला ईश्वरीय जन्म आहे, ईश्वरीय परिवार लाभला आहे, ईश्वरीय पालना प्राप्त आहे, ईश्वरीय शक्ती व वरदानांची वर्षा रोज आपल्यावर होत आहे.

एकदा बाबांनी ज्ञान मुरलीत सांगितले होते की ब्रह्माबाबांना नशा

आहे की या भृकुटी सिंहासनावर दोन तारे चमकत आहेत– एक शिवबाबा व दुसरे ब्रह्माबाबा. डबल पॉवर आहे. आपणही हा स्वमान घेऊ शकतो. एक मी आत्मा स्वतःच सर्व शक्तींनी समर्थ आहे व माझ्या सोबत बापदादा आहेत. एकदा अव्यक्त बापदादांनी ज्ञानमुरलीत सांगितले होते की तुम्हा मुलांकडून त्रिमूर्ती लाइटचा साक्षात्कार झाला पाहिजे. साक्षात्काराची लहर जेव्हा पसरेल तेव्हाच बाबांची प्रत्यक्षता होईल. बाबा या सृष्टीवर अवतरित होऊन स्थापना, पालना व विनाश अशी तीन कर्तव्ये करतात. आपणही मास्टर त्रिमूर्ती आहोत. आपल्या एका बाजूला शिवबाबा, दुसऱ्या बाजूला ब्रह्माबाबांचा आत्मा आणि मध्ये मी आत्मा. पांडव भवनमधील हिस्ट्री हॉलमध्ये त्याकाळी दोन गाद्या असायच्या. एका गादीवर ब्रह्माबाबा, दुसऱ्या गादीवर मम्मा मातेश्वरी आणि मध्ये एक खुर्ची टाकून त्यावर एक ब्रह्मावत्स (एखाद्या भाई–बहिणीला) बसवायचे. अशाप्रकारे मास्टर त्रिमूर्ती या आसनावर बसल्यानंतर कुणाविषयी घृणा नाही, वैरभाव नाही, द्वेष नाही. खूप पवित्र असे हे आसन आहे. त्यामुळे या स्वमानाचा अभ्यास करा.

आता ही वेळ आहे, बाबांच्या शक्ती प्रत्यक्ष करण्याची. त्यासाठी आपल्या सेवाकेंद्राचे वायुमंडळ अतिशय शक्तिशाली बनवले पाहिजे. फलस्वरुप दूरवरच्या आत्म्यांना आकर्षण वाटले पाहिजे. त्यांना येथे आल्यानंतर शक्ती प्राप्त झाली पाहिजे. आपला योग असा पाहिजे की ज्याच्या शक्तीने सर्वत्र शांती पसरली पाहिजे. ज्याप्रमाणे एखादी पवित्र आत्मा जेव्हा शरीर सोडतो तेव्हा चारी दिशांना आपोआपच शांती पसरते. त्याप्रमाणे आपण पवित्र आत्मे जेव्हा देहभान सोडतो व प्रभु स्मृतीत स्थित होतो. त्यावेळी देखील शांतीची, पवित्रतेची, शक्तीची प्रकंपने सर्वत्र पसरतात. म्हणूनच या अभ्यासाची वर्तमान काळात आवश्यकता आहे. मुख्य म्हणजे आपल्या संकल्पांना, शक्तींना व वेळेला सफल करा. या गोष्टी सगळ्यांकडे आहेत परंतु कार्यामध्ये लावण्याची आवश्यकता आहे. आपण अनेक वर्ष ज्ञानाचे आचरण करीत आहोत. पवित्रतेची, योगाची शक्ती आपल्याकडे आहे शुद्ध अन्न सेवन करीत आहोत. आपल्यात खूप शक्ती जमा आहेत पण त्या शक्ती निष्फळ जात आहेत. या शक्तींचा यथार्थ उपयोग होत नाही. **ज्याप्रमाणे एखाद्याकडे धन आहे. तथापि ते लॉकरमध्येच आहे. त्याचा उपयोग केला नाही तर काय फायदा? आपल्याकडे योगाची संपत्ती आहे. पवित्रतेची संपत्ती आहे. ज्ञानाची संपत्ती आहे. एक एक बाबांचा मुलगा सर्व संपत्तीने संपन्न आहे. ही संपत्ती सेवेमध्ये लावायला पाहिजे. जर कार्यात वापरली नाही तर ती संपत्ती निष्फळ मानली जाईल.**

आपल्याकडे ज्ञान ऐकविण्याची शक्ती आहे चांगले चिंतन, करुन लेख लिहिण्याची शक्ती आहे. आमच्याकडे दुसऱ्यांना ज्ञान समजावून, त्यांचा उमंग–उत्साह वाढविण्याची शक्ती आहे, पण काय? ती शक्ती सफल होत नाही. सेवेमध्ये शक्ती लावणेच सफल करणे होय. सेवेमध्ये लावत नाही आणि आम्ही म्हणतो आमच्याकडे आहे तर ती असूनही निष्फळ आहे.

त्यामुळे चेक करा – काय मी माझ्याकडील सर्व शक्ती सफल करीत आहे? शिवबाबांनी आम्हा सर्वांना शक्ती समान रुपात दिल्या आहेत. कोणालाही जास्ती दिली नाही. एक एक मुलाला मास्टरची पदवी मिळाली आहे. बाबा ज्ञानाचे सागर तर आम्ही मा. ज्ञानाचे सागर आहोत बाबा सर्वशक्तिवान आहेत. आम्ही मा. सर्व शक्तिवान आहोत. परंतु या सर्व गोष्टी स्वतःसाठी, अन्य आत्म्यांसाठी, संपूर्ण विश्वासाठी, प्रकृतीसाठी सेवेमध्ये लावत आहोत का? जर नाही, तर त्या निष्फळ होत आहेत. शक्ती आहेत, पण वापरत नाही. वापरा त्या शक्ती. बाबा एक स्तोगन ऐकवितात की कोणाची संपत्ती धुळीत दबून राहील. कोणाची राजा खाईल. कोणाची चोर लूटेल. कोणाची आगीत जळून खाक होईल सफल त्याची होईल, जो धनीच्या नावे खर्च करेल अर्थात शिवबाबांच्यासाठी खर्च करेल. शक्ती सगळ्यांकडे आहेत. कोणी आपल्यासाठी संपत्ती वापरुन संपवून टाकतो तर कोणी सेवेत लावून अथवा धंद्यात लावून ती संपत्ती अनेक पटीने वाढवतो. समजदार कोण?

(पान क्र. २६ वर)

मालाड (प.): येथील पोलिस स्टेशनमध्ये रस्ता अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहतांना ब्र. कु. शोभा बहेन, ब्र. कु. धनश्री बहेन व पोलिस स्टाफ.

चंद्रपूर : 'भ्रष्टाचार निर्मूलनासाठी समाज जागृती' या कार्यक्रमात सहभागी मान्यवरांबरोबर ब्र. कु. दीपक भाई.

राहुरी : नवरात्रीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रसंगी डॉ. के. पी. विश्वनाथ, ब्र. कु. नलिनी दीदी, नंदा दीदी व अन्य मान्यवर.

ओतुर (पुणे): जेष्ठ नागरिक संघाच्या वार्षिक सभेत दीप प्रज्वलन करतांना ब्र. कु. सीमा बहेन व अन्य मान्यवर.

संगमनेर : सामाजिक कार्यकर्ते भ्राता अरुण इयापे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. अनिता बहेन, शेजारी स्वामी दीनानाथ

पाचोरा : पिपल्स बँकेतील स्टाफला ईश्वरीय संदेश देतांना ब्र. कु. मीरा बहेन शेजारी ब्र. कु. नंदा बहेन.

बांबवडे (कोल्हापूर) : चैतन्य देवीच्या झांकीचे उद्‌घाटन करतांना ब्र. कु. सुनंदा दीदी, संगीता बहेन, सरपंच कांबळे व पत्रकार केसरे.

अहमदनगर : राष्ट्रीय किर्तनकार इंदुरीकर महाराज यांचा सत्कार करतांना बी. के. शैलजा व बी. के. कोळपकर माता.

भिलवडी (सांगली) : रेल्वे स्टेशनवर 'स्वच्छता अभियान' कार्यक्रमानंतर स्टेशन मास्टर जे. एन्. साय व प्रमोद सावंत यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना बी. के. मीरा बहेन व बी. के. परिवार.

टाकळीहाजी (शिरुर) : चैतन्य देवींच्या झांकीचे प्रसंगी उपस्थित संचालक श्री. राजेंद्र गावडे, सरपंच श्री. बोडे, ब्र. कु. अर्चना, शकुंतला व सुप्रिया.

नागठाणे (सातारा) : नवरात्रीत ३०० कन्यांना दुर्गा देवीचा मुखवटा घालून, जागतिक रेकॉर्ड प्रस्थापित करतांना, ब्र. कु. डॉ. दीपक हरके व अन्य.

संगमनेर : तपस्या भवनमध्ये 'तन, मन व आत्मा स्वस्थ ठेवण्याची कला' या विषयावर मार्गदर्शन करतांना ब्र. कु. मीरा दीदी (मलेशिया)

अमृतवेळेला झोप, सुस्ती वा आळस येऊ नये, यासाठी काय कराल?

ब्र. कु. गोदावरी दीदी, मुलुंड (मुंबई)

पहिल्यांदा आपल्या मनाला समजवा की अमृतवेळेला तपस्येच्या वेळी कधीही झोप येता कामा नये. आपले मन एखाद्या लहान मुलाप्रमाणे आहे. त्याला पुन्हा-पुन्हा समजावून सांगा म्हणजे ते अवश्य मानेल.

वास्तविक योग करतांना डोळे बंद होणे म्हणजे बाबांचा अनादर (डिसरिगार्ड) करण्यासारखे आहे. आधी यज्ञात दर शनिवारी रात्री योग तपस्येचा कार्यक्रम असे. त्यावेळी खरंच बहिणी आपली वेणी (चोटी) कशाला तरी बांधून ठेवत असत म्हणजे झोप येताच झटका बसत असे व डोळे उघडत असत. ब्रह्माबाबासुद्धा रात्र-रात्र बसून तपस्या करीत असत. म्हणूनच ते नंबर १ बनले. आपण सुद्धा पूर्वज आत्मे आहोत. आपल्याकडे अंतिम विनाशाच्या समयी हजारो-लाखो आत्मे शांतीची अंचली मागण्यासाठी येतील. त्यावेळी आपल्याजवळ जर शांतीचा स्टॉक नसेल तर आपण त्यांना काय देणार?

त्यामुळे आता आपल्याला निद्राजीत बनून, तपस्या करणे अति आवश्यक आहे. तपस्येद्वारे जमा केलेली शक्तीच आपल्याला शेवटी कामी येणार आहे. त्यासाठी आपल्या मनाला वारंवार समजवा अमृतवेळेला स्वयं भगवान भाग्य वाटतो. त्यावेळी जर आपण झोपलो किंवा सुस्ती केली तर आपण भाग्यशाली कसे बनू? नंतर शेवटी पश्चाताप करायची वेळ येईल. इतकी वर्षे ज्ञानात चालूनही जर आपण आपल्यातील कमी-कमजोरी काढू शकत नसू तर मग ती कधी काढणार? आपल्या मनाला विचारा की, मी श्री लक्ष्मीला वा श्री नारायणाला वरण्यासाठी योग्य बनलो आहे का? मी सत्ययुगात जाण्यासाठी योग्य बनलो आहे का? माझे सत्ययुगातील पद काय असेल? ईश्वरीय ज्ञानाच्या आरशात वारंवार स्वतःला पाहा. वास्तविक या छोट्याशा संगमयुगातच आपण भविष्य २१ जन्मांचे प्रारब्ध प्राप्त करू शकतो. तसेच ईश्वरीय मीलनाद्वारे अतींद्रिय सुखाची अनुभूती करू शकतो. मग आपण यासाठी निद्राजीत बनणार नाही का?

मम्मा-बाबा समान तीव्र पुरुषार्थ करायचा असेल तर अमृतवेळेचा योग शक्तिशाली करणे अत्यावश्यक आहे. मम्मा रोज सकाळी उठून, २ ते ५ वाजेपर्यंत तपस्या करीत असत. पिताश्री ब्रह्माबाबा देखील अशीच तपस्या करीत असत. आपण ब्रह्मावत्स त्यांना फॉलो कधी करणार? संगमयुग संपल्यावर फॉलो करणार का? त्यामुळे आता कुठलीही बहाणेबाजी करु नका. त्यासाठी पुढील ५ गोष्टी लक्षात ठेवा, ज्यातून नक्कीच मनाला प्रेरणा (Motivation) प्राप्त होईल.

१) जबाबदारीची जाणीव – (मी पूर्वज व पूज्य आत्मा आहे)

कुठलीही जबाबदारी आपल्यावर असली की आपली झोप आपोआप उडून जाते. जशी एखादी स्त्री जेव्हा माता बनते तेव्हा तिला आपल्या बाळाच्या नुसत्या हालचालीने, जराश्या रडण्याने सुद्धा जाग येते. ती लगेचच त्याला काय हवे, काय नको ते ओळखते व आपल्या बाळाला कुशीत घेऊन शांत करते. ती स्वतः आजारी असली तरी आपल्या बाळासाठी रात्र-रात्र जागते. मुख्य म्हणजे या गोष्टीचा तिला त्रास देखील वाटत नाही. हे सगळे ती का व कशासाठी करते? कारण ती स्वतःला बाळाच्या संगोपनासाठी जबाबदार

समजते. तसेच आपण विश्वकल्याणकारी आत्मे आहोत. साऱ्या जगाला बदलण्याची आपली जबाबदारी आहे. पुरुष (सर्व आत्मे) व प्रकृती (५ तत्त्वे) यांना बदलण्याची आपली जबाबदारी आहे. सर्वांना सकाश द्यायचा आहे. बापसमान दुःखहर्ता-सुखकर्ता बनायचे आहे... या सर्व जबाबदारींची जाणीव ज्याला असेल त्याला झोप वा सुस्ती येणार नाही.

काही ब्रह्माकुमार असा युक्तिवाद करतात की दिवसाभरात आम्हाला खूप शारीरिक कष्ट पडतात. परंतु जर देह अभिमानात राहून कर्म केले तरच शरीर थकते. त्यामुळे अमृतवेळेला उठावेसे वाटत नाही. याउलट जर आपण आत्मअभिमानी होऊन दिवसभर कर्म केले तर आपल्याला शारीरिक थकावट येणार नाही व आपण निद्राजीत बनू शकू.

२) पुरुषार्थाची चिंता :(मला बाप समान बनायचे आहे.)

मला थोड्या कालावधीत संपन्न, संपूर्ण व बापसमान बनायचे आहे. मला तीव्र पुरुषार्थ करायचा आहे. मला नंबर १ बनायचे आहे. यासाठी मला अमृतवेळेला शक्तिशाली योग करणे आवश्यक आहे. ही पुरुषार्थाची काळजी आपल्या मनाला लागली पाहिजे.

मला साऱ्या विश्वाला सुख-शांती द्यायची आहे. द्वापर युगापासून माझे लाखो भक्त माझ्या दर्शनाला येतील. त्यांच्या मनोकामना मला पूर्ण करायच्या आहेत. त्यासाठी मला स्वतःमध्ये भरपूर स्टॉक जमा करण्याची वेळ अमृतवेला आहे. त्यावेळी जर मी शक्तिशाली योग केला नाही तर संगमयुगात मला मिळालेली हिरेतुल्य संधी मी व्यर्थ गमवतो आहे.

मला बापदादांच्या आशा पूर्ण करायच्या आहेत. त्यासाठी मला तीव्र पुरुषार्थ करणे, गरजेचे आहे. वास्तविक अमृतवेळेला निद्रा त्यावेळी येते जेव्हा आपण महाभारी विनाशाला विसरतो, आपल्या दुःखी, अशांत भावंडांची आर्त पुकार आपल्याला ऐकू येत नाही. जर आपल्याला ही पुकार ऐकू आली तर आपल्याला कधीही अमृतवेळेला झोप येणार नाही.

३) सदैव अमंग-उत्साहात रहा.

यासाठी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सद्गुरु शिवबाबांनी दिलेल्या आज्ञांवर चला. जेव्हा आपण त्यांची अवज्ञा करतो तेव्हा आपल्यावर ओझं (बोझ) येतं. परिणामतः आपला उमंग-उत्साह गायब होतो. दिवसाभरात मनात उत्पन्न होणाऱ्या वासना, तृष्णा, इच्छा ह्या आपल्याला शिवबाबांच्या मीलनापासून दूर करतात. मग आपण म्हणतो की बाबा अनुभव करवत नाहीत.

रामायणात आपण पहातो की सीता जेव्हा मर्यादांची लक्ष्मणरेषा पार करून गेली तेव्हाच तिला रावणाने पळवून नेले. त्यामुळे आपण देखील ब्राह्मण जीवनात मर्यादांचे पालन केले तरच आपला उमंग-उत्साह कायम राहिल व आपण फरिश्ता बनून, उडती कलाचा अनुभव करू.

४) रोज अमृतवेळेला नवीन-नवीन अनुभव करा

रोज नवीन-नवीन अनुभव करण्यासाठी, झोपण्यापूर्वी हे निश्चित करा की मला उद्या अमृतवेळेला कुठल्या शक्तीचा वा गुणाचा अनुभव करायचा आहे. जर अशा प्रकारची नवीनता आपण आणली तर आपल्याला अमृतेवेळेला कधीही सुस्ती वा आळस येणार नाही. याउलट रोज-रोज जर आपण तेच-तेच अनुभव करीत असू तर मात्र सुस्ती अवश्य येईल.

समजा आपल्याला कुणी सांगितले की, उद्या आपल्याला लांब कुठेतरी पिकनिकला जायचे आहे तर आपल्यात किती स्फूर्ती निर्माण होते. आपली तब्बेत बरी नसली तरी आपण औषधपाणी बरोबर घेऊन पिकनिकसाठी अवश्य जातो. तसेच रोज नवीन-नवीन ठिकाणी शिवबाबांच्या बरोबर जा. योग अर्थात मन-बुद्धीची यात्रा होय. कधी स्वर्गात जा, कधी मधुबनमध्ये जा, कधी तीन लोकांची सफर करा, कधी बाबांच्या झोपडीत जाऊन बाबांशी वार्तालाप करा. तात्पर्य म्हणजे आपल्या तपस्येत नवीनता आणा.

५) दिवसाभरातील सूक्ष्म अवज्ञांमुळे अमृतवेळेला सुस्ती वा आळस येतो –

जो ब्राह्मण आत्मा दिवसाभरात ईर्ष्या, द्वेष, परदर्शन, परचिंतन करत असेल, त्याला अमृतवेळेला आनंदाचा अनुभव होण्याऐवजी आळस वा सुस्तीचा अनुभव होईल. त्यामुळे आपली दिनचर्या पूर्णतः श्रीमतानुसार असणे आवश्यक आहे. आपले आचरण ईश्वरीय नियम व मर्यादा यानुसार असले पाहिजे. याचे उल्लंघन केल्याने सूक्ष्म पापांचे ओझे आत्म्यावर चढते. त्यामुळे अमृतवेळेला शक्तिशाली योग लागत नाही.

ज्या परमात्म प्राप्तीसाठी आपण मागील६३ जन्म रानी-वनी भटकत होतो, तो आता आपल्याला भेटला आहे. त्याची मीलनाची वेळ ही अमृतवेळा आहे. त्यावेळी जर आपण झोपत असू तर याला काय म्हणाल? 'दैव देतं, कर्म नेतं' असंच म्हणावं लागेल. कारण त्यावेळी स्वयं भगवान भाग्य देण्यासाठी, वरदान देण्यासाठी आपल्या दारी येतो. परंतु आपण मात्र झोपेच्या आहारी जाऊन, दारी आलेल्या भगवंताकडे दुर्लक्ष करतो. अशी संधी पुन्हा कल्पभरात येणार नाही. म्हणूनच म्हटले जाते - 'जिन सोया, तिन सोया'.

तात्पर्य म्हणजे अमृतवेळा ही अपार प्राप्तींची वेला आहे. परमात्म मीलनाची वेळ आहे. परंतु या सर्व गोष्टी आपल्याला संगमयुगात विनासायास, विनामूल्य प्राप्त होत असल्याने, त्याचा आपल्याला विसर पडतो. तात्पर्य म्हणजे अमृतवेळेला होणाऱ्या अनंत प्राप्ती, सदैव लक्षात ठेव. याच वेळी सुख-शांतीचे भांडार देण्यासाठी स्वयं भगवान येतात, ज्यांच्या छोट्याशा अंचलीसाठी सारी दुनिया तडपते आहे. ही स्मृती असेल तर अमृतवेळेला झोप येणे, अशक्य आहे. त्यामुळे अमृतवेळेला मम्मा-बाबांप्रमाणे रोज खूप तपस्या करा. शिवबाबांकडून स्वतःला इतके भरपूर करा की तो स्टॉक आपल्याला संपूर्ण कल्पभरासाठी उपयोगी पडेल.

या अनुषंगाने दि.८/७/१९७३ च्या अव्यक्त मुरलीतील बापदादांचे पुढील महावाक्य सदैव लक्षात ठेवा - ''मीठे बच्चे, अमृवेले पॉवर हाऊस से फुल पॉवर लेने का जो नियम है, उसको बार-बार चेक करो। उठकर बैठ गये, यह तो नियम पालन किया लेकिन कनेक्शन ठीक है अर्थात प्राप्तियों का अनुभव होता हैं? अमृतवेले का यथार्थ कनेक्शन अर्थात सर्व पॉवर्स और सर्व प्राप्तियोंका अनुभव होना। अगर आदि काल (अमृतवेला) ठीक न होता तो मध्य और अन्त भी ठीक न होगा।''

तात्पर्य म्हणजे अमृतवेळेचा समय हा विशेष ब्राह्मण आत्म्यांसाठी आहे. याचवेळी शिवबाबा आपल्या मुलांची विशेष पालना करतात. जेथे अमृतवेळेचा समय आहे त्या स्थानी, त्यावेळी शिवबाबा विशेष दृष्टी देतात. तसेच त्यावेळी वातावरण शांत असल्याने आत्मा सहजच ब्रह्म लोकनिवासी बनतो. अर्थात शांतीचा अनुभव करतो. त्यामुळे आपण अमृतवेळेचा समय पूर्णतः सफल करुया व मम्मा-बाबांप्रमाणे तपस्वी मूर्त बनूया.

***

वाचकांशी हितगुज

१) वाचकांनी तसेच सेवाकेंद्राच्या टीचर बहिणींनी एप्रिल २०१९ पासून सुरु होणाऱ्या नवीन वर्षाच्या 'अमृतकुंभ' ची मागणी फेब्रुवारी २०१९ अखेरपर्यंत कळवावी. म्हणजे त्यानुसार अंक छापणे सुकर होईल. **विशेष बाब म्हणजे पेपरच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने, पुढील वर्षाची वर्गणी रु.७५/- व आजीव सभासद वर्गणी रु.१४००/- इतकीच ठरविण्यात आली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.** २) सन २०१८-१९ ची वर्गणी अद्याप थकित असल्यास, ती लवकरात लवकर प्रकाशक अमृतकुंभ यांच्या पत्त्यावर पाठवावी. तसेच 'डिमांड ड्राफ्ट' पाठवितांना, तो 'अमृतकुंभ प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' च्या नावानेच पाठवावा.

- प्रकाशक अमृतकुंभ

अमृतकुंभाच्या सर्व वाचकांना नववर्ष २०१९ च्या हार्दिक शुभेच्छा! नूतन वर्ष आपणा सर्वांना सुख, शांती व समृद्धीचे जावो, हीच मंगल कामना!

- ब्र. कु. गोदावरी दीदी, प्रकाशक

निःस्वार्थ सेवा देई आत्मिक सुखाचा मेवा

(भाग १)

ब्र.कु. हेमंत भाई, शांतिवन, आबू रोड

महाराज जनक जगाचा निरोप घ्यायच्या तयारीत होते. जेव्हा त्यांचा अंतिम समय समीप आला, तेव्हा स्वतः धर्मराज त्यांना स्वर्गात नेण्यासाठी हजर झाले. कारण न्यायप्रिय, कर्तव्यनिष्ठ राजा असूनही जनकराजाने निर्लिप्त जीवन व्यतीत केले होते. त्याचबरोबरच तपश्चर्येमध्ये कोणतीही कमी केली नव्हती. स्वर्गात जायच्या आधी नर्क आले व तिथे प्रत्येकाच्या पापकर्माप्रमाणे यातना दिल्या जात होत्या. त्यांचा आक्रोश ऐकून राजा जनक तिथेच थांबले. त्यांनी त्यांच्या आक्रोशाचे कारण विचारले. तेव्हा धर्मराज त्यांना म्हणाले, 'महाराज, हा नर्क आहे. आयुष्यभर फक्त आणि फक्त पापच करणाऱ्या पाप्यांना इथे सजा दिली जात आहे. हे ऐकून राजा जनक म्हणाले, ' यांच्या मुक्तीचा कोणता मार्ग नाही का?' त्यावर धर्मराज उत्तरले, 'ह्या सर्वांनी आयुष्यभर इतरांना क्रूरतेने त्रास देऊन त्रस्त केलेयं. लोकांच जगणं नकोनकोसं करून टाकलं, त्यामुळे त्यांच्या पापाचा अंत नाही. अशा दुराचारींना मुक्ती कशी बरे मिळेल?

त्यावर जनक म्हणाले, 'परंतु ह्यावर काही ना काही तर उपाय असेलच ना?' तेव्हा धर्मराज म्हणाले, 'होय, महाराज, एक उपाय आहे. परंतु फारच कठीण! जर कुणी स्वतःचे सारे पुण्य दान केले तर ह्या सर्वांना मुक्ती मिळू शकेल'. हे ऐकताच जनक म्हणाले, 'तर मग ठीक आहे. मी आयुष्यभर अर्जन केलेले सारे पुण्य ह्या दुःखी कष्टींना मुक्त करण्यासाठी दान करतो.' हे ऐकून धर्मराजाने महाराज जनकांना विचारलं, 'महाराज, कठोर तपश्चर्येने प्राप्त केलेले पुण्य, नीच अधम पापींना का म्हणून दान करता?' **त्यावर गंभीरतेने जनक म्हणाले, 'धर्मराज, मनुष्याचा खरा धर्म आहे मानव सेवा, तसे पाहिले तर, अंत पापीचा नव्हे, त्याच्या पापांचा केला पाहिजे. कारण पापास जन्म देणाऱ्या दुर्गुणांचा नाश केल्यानेच पापकर्मावर आळा बसू शकतो.** ज्यामुळे पापींचा उद्धार करणे संभव होते. म्हणूनच मी त्यांच्या पाप वृत्तीचा नाश करण्यासाठी माझे पुण्य देत आहे. ज्यामुळे येणाऱ्या पिढ्या मानव सेवेलाच सर्वश्रेष्ठ धर्म मानतील व सेवेचे पुनित कर्म करत राहतील. महाराज जनकांच्या ह्या निःस्वार्थ सेवेला दाद देत धर्मराजांनी सर्वांना मुक्त केले.

राजा जनकांसारखी थोडीफार निःस्वार्थ सेवा करून इतिहास रचणाऱ्या सत्कर्मी पुरुषांची जगात कमी नाही. कारण सेवेची नाना रुपं आहेत. कुणी तहानलेल्यास पाणी पाजण्यास व भुकेलेल्यास भोजन देण्यास सेवा समजतो, तर कुणी उघडे अंग झाकण्याकरिता वस्त्रदान करून लज्जा रक्षण केल्याने आब्रू (इज्जत) वाचविण्यास सेवा मानतो. कुणी अपंग, लुळ्या-लंगड्या, आंधळ्या-पांगळ्या इसमास रस्ता पार करण्यासाठी हात देतो, तर कुणी गरजूची गरज भागविण्यासाठी मदतीचा हात पुढे करतो. कुणी आजाऱ्यास औषध देऊन आरोग्यदान करण्यात धन्य धन्य होतो. तर कुणी अचानक संकट समयी देवासारखा धावून जाण्यास सेवेचे नाव देतो. ह्या विशाल विश्वात सेवेची गरज कुणास नाही? **परंतु खरी सेवा ती कोणती? स्वार्थ सिद्धीचा उद्देश त्यागून अन् सर्वस्व पणाला लावून सर्वांना सुख देणे हीच खरी सेवा होय.** एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या सुख-सुविधा व साधन संपत्तींचा त्याग केला. स्वतःस

सर्वांना सुख देण्यात समर्पित केले. तन-मन-धन अन् रक्ताचा कण नी कण विश्व कल्याणासाठी अर्पित केला. इतरांच्या भल्यासाठी प्राणपणाला लावले. दुसऱ्यांना दुःखातून मुक्त करण्याकरता देह झिजवला. आरामाला तिलांजली देऊन, रात्रंदिवस अथक होऊन, कल्याणकारी कार्य करण्यात आयुष्य घालवले. ज्याचा जगी कुणी नाही, जे परके आणि पोरके आहेत अशा असहाय्य व अनाथांची मदत करण्यात जीवाचे रान केले. परंतु मोबदल्यात कवडीची ही अपेक्षा केली नाही. पतित-पददलीत, तिरस्कृत-बहिस्कृत, रंजल्या गांजल्यांचा उद्धार केला आणि असे परोपकारी कार्य करत-करत, श्वास न श्वास जनता जनार्दनाच्या सेवेसाठी खर्ची केले. खरे तर हेच जनमानसाला अविरत सुख देणारे उदात्त कर्मच मानव सेवा होय. म्हणून म्हटले ही जाते - 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा' अशी मानव सेवाच अक्षय पुण्याची प्राप्ती करवते आणि स्वर्गाचे द्वार उघडते.

तसे पाहिले तर देवाघरी जाताना मनुष्य मुठीत काय बरं घेऊन जातो? पैसा-अडका, धन-दौलत, महाल-माडी, घोडा-गाडी जिथले तिथेच राहून जाते. सोबत जातो तो त्याच्या कर्माचा हिशोब. व्यक्ती पैशासाठीच काबाड कष्ट करतो. पोटाचा घास वाचवून कवडी कवडी जमा करतो. परंतु जर पात्रता बघून सुपात्राला व गरजवंताला अन्न-जल-वस्त्र-धन इत्यादीचे दान दिले तर ते दान घेणाऱ्याचा आशिर्वाद, कधी ना कधी वर्तमान किंवा भविष्यात परतफेड बनून प्रतिफळाच्या रुपात प्राप्त होतात. ह्यात लेशमात्र शंका नाही. गेल्या जन्मी हॉस्पिटल व शाळा-कॉलेज उघडल्याने ह्या जन्मी शिक्षण व आरोग्य इत्यादींचा लाभ होतो. विनाशी वस्तू वैभवांनी इतरांना सुख दिल्याने मोबल्यात भौतिक सुख प्राप्त होते. स्थूल साधन संपत्ती मंगल कार्यात लुटल्याने समाधानाने झोळी भरते. **'जे पेरले, ते उगवते'. ह्या निसर्ग नियमाप्रमाणे, सेवा अल्प वा दीर्घ सुखाचा सुका मेवा अवश्य देते.**

कधीही कुठेही वाया न जाणारे, निष्फळ न ठरणारे व कधी ना कधी फलित होणारे एक आणि एकच पुनित कर्म व स्वउत्थानाचा, स्व उन्नतीचा धर्म आहे सेवा. एखादे क्लिष्ट कठीण कार्य करून ही फळ मिळेलच ह्याची गॅरन्टी नाही. परंतु संकटात फसलेल्या व्यक्तिची मनोभावे केलेली सेवा लगेच सेवा घेणाऱ्याच्या अंतःकरणातून आशिर्वादाचा धो-धो पाऊस पाडते. त्यातच व्यक्ती खूपच अडीअडचणीत वा जीवघेण्या परिस्थितीच्या चक्रव्यूहात फसला असेल व जवळपास मदत करणारा कुणीच नसेल, अशा वेळस मरत असतांना कुणी थेंबभर पाणी ही पाजले किंवा स्वतःच्या ताटातली शिळी भाकरी जरी दिली तरी जीव वाचल्याने, व्यक्ती दुवांची दौलत देऊन जातो. गरजवंताला काडीभर केलेल्या मदतीने त्याच्या मनापासून निघालेले आशीर्वाद पदरी पडतात. **त्यासोबतच सेवा केल्या-केल्या लगेचच उत्स्फूर्त खुशीचा अनुभव होतो. कारण देण्यातच खरा आनंद सामावलेला असतो. म्हणूनच जो करतो निःस्वार्थ सेवा तोच खातो खुशीचा खवा.**

वर्तमान समयी विश्वपिता शिव परमात्मा स्वतः विश्वसेवाधारी बनून, सेवेचे मोल-महत्त्व-महात्म्य समजावून सांगत आहेत. तनाने ज्ञान यज्ञाची कर्मणा सेवा केली तर जन्मोजन्मी निरोगी काया लाभते. मन परमात्म आठवणीत रममाण केल्याने व शुभभावना-शुभकामना आणि सद्भावनांचे अविरत दान दिल्याने मन नेहमी प्रसन्न राहते. अर्थात मन उदास-निराश-हताश न होता, खुशीचा खुराक खाऊन, मन निरंतर आनंदीत राहू लागते. धन ईश्वरीय सेवेत लावल्याने कुबेराची खाणच जणू हाती लागते व त्यामुळे अठरा विश्व दारिद्र्य ही संपते. **एकूण संगमयुगात तन-मन-धन ईश्वरीय सेवेत सफल केल्याने 'कदम कदम में पद्म' म्हणजे 'प्रत्येक पाऊला-पाऊलात' पद्मगुणा पुण्य प्राप्त होते.** जो ईश्वरीय सेवेत सदैव हजर असतो, परमात्म्याच्या श्रीमताप्रमाणे सेवेत 'हाँ जी, हाँ जी' हा पाठ पक्का करतो. जो समय-संकल्प-श्वास सेवेत समर्पण करतो. जो तन-मन-धन शिवपित्यावर अर्पण करतो, तो स्वर्गिक बादशाहीचा वारसा प्राप्त करतो व

सत्ययुगी स्वराज्याचा अधिकारी सिद्ध होतो.

सेवाच सत्य-त्रेता-द्वापर वा कलि ह्या चारही युगात राज्य सिंहासनाचा अधिकारी बनविते. ज्ञानमार्गाचे चार विषय आहेत ज्ञान, योग, धारणा व सेवा. ज्ञान, योग, धारणा व सेवा ह्या चारही विषयात फुल मार्क्स मिळवल्यानेच सत्ययुगी विश्वमहाराजन बनतो. योग-धारणा-सेवा ह्या तीन विषयात पक्के असून ही पहिला ज्ञानाचा विषय कच्चा राहिला, तर अर्धवट ज्ञानाने मन-बुद्धी दुविधेत पडते. मायेशी युद्ध होत राहिल्याने कधी हार तर कधी जीत झाल्याने विकारांवर संपूर्ण विजय मिळत नाही, त्यामुळे त्रेतायुगाचा राजा बनतो. दैवी गुणांची धारणा व जनसेवा केल्याने अर्थात धारणा व सेवा हे दोन विषय पक्के असले तर द्वापरयुगात राजा बनतो. आध्यात्मिक ज्ञान व ईश्वराशी योग नसला, दैवी गुणही असले नसले तरी फक्त जनता जनार्दनाची सेवा केल्याने कलियुगी राज्यपद मिळते. (लोकशाहीत लोकांची सेवा केल्याने लोकप्रिय बनून लोकांद्वारे निवडणूकीत निवडून आल्याने पंतप्रधान बनता येते.) **सेवा ह्या चौथ्या विषयात उत्तीर्ण झाल्याविना कोणत्याही युगात राजा बनता येत नाही. कारण 'सेवा देते आशीर्वाद' व 'आशीर्वाद घेणाराच प्रभूपसंत-लोकपसंत-स्वयंपसंत हे तीन सर्टिफिकेट घेऊन, सर्व युगांमध्ये लोकप्रिय राजा बनतो. सेवेची ख्याती व सेवेची नियती सदा-सर्वदा सुखकारी, सर्व हितकारी-मंगलकारी ठरते.**

स्थूल साधन संपत्तीद्वारे अल्पकालीन सुख देणाऱ्या सेवेची परिपाटी सदैव चालत आलीयं. परंतु आता तर स्वतः शिव पिताच सदाकालीन अविनाशी सुख शांतीचा वारसा हक्क देण्यासाठी अवतरित झालेले आहेत. म्हणून परमात्म्याचा परिचय देऊन, आत्मारुपी पुत्राचे पिता परमात्म्याशी मिलन करविणे; सर्वात श्रेष्ठ पुण्यप्रदाई सेवा होय. कारण पित्या परमात्म्याशी आत्म्यांची गाठभेठ व सांगड घातल्याने कोणतेही दुःख शिल्लक उरत नाही. प्रभुमिलनाने अतींद्रिय सुख तर लाभतेच, त्यसोबत मुक्ती-जीवनमुक्तीची दारे ही उघडली जातात. ईश्वरीय ज्ञान दिल्याने आत्मारुपी मुलांना संगमयुगात शिवपित्याचा ज्ञान-गुण शक्तींचा वारसा व भविष्यात स्वर्गाच्या बादशाहीचा वारसा हक्क प्राप्त होतो. आत्मिक सुख व मनःशांतीच्या अनमोल रत्नांनी आत्म्यांची झोळी भरपूर केल्याने आपल्याला पदमापदम सौभाग्य प्राप्त होते. **अशी आत्मा व परमात्म्याचे महामिलन करविण्यास निमित्त बनविणारी निःस्वार्थ सेवाच, परमात्म दुवांचा अधिकार देते व शिवपित्याच्या हृदय सिंहासनाचा राजा ही बनविते. शिवपित्याचे प्रेम प्रकट करणारे हे गीत तेच सांगते, ''शिवबाबा को लगते प्यारे, दिनरात जो सेवा में गुजारे''.**

मात्र ह्या उलट नाम-मान-शान इत्यादीची इच्छा बाळगली, सेवा केल्यावर स्वतःचे गौरव गान ऐकायचे मनात स्वप्नं रंगवत राहिले. स्वार्थ सिद्धीसाठी सहयोग दिला व परतफेडीची अपेक्षा ठेवली. सेवा करून वर्णन करत फिरले व स्वतःच्या तोंडून स्वतःच स्वतःच्या कार्याची स्तुती करत राहिले व इतरांच्या नजरेत मोठं होण्यासाठी सेवा केली तर भाग्याच्या झोळीला छिद्रं पडतात व पुण्याची गळती व्हायला वेळ लागत नाही. माझा वर्तमानपत्रात व मासिकात फोटो छापला गेला पाहिजे. टी.व्ही.द्वारे माझ्या सेवेचा प्रचार झाला पाहिजे. मला जग प्रसिद्धी लाभली पाहिजे. माझ्या सेवेची सर्वत्र चर्चा झाली पाहिजे. सेवा घेणाऱ्यांनी माझा उदोउदो केला पाहिजे. गरजूने मदतीसाठी लोळण वा लोटांगण घातले पाहिजे. लोकांनी पाठीमागे फिरले पाहिजे अशा तुच्छ मानसिकतेने केली गेलेली सेवा, सेवा नव्हे. अशी सेवा नाव मोठे करून अमर करण्याऐवजी, मनुष्याला मातीमोल करून मातीत मिळवते. मदतीच्या मोबदल्याची अपेक्षा पुण्यफळापासून वंचित करते. सेवेची वाखाणणी करवून घेतल्यास जनमानसाच्या मनातून ही माणूस कधीच उतरुन जातो.

परंतु आढेवेढे न घेता मानपान न मागता, मुक्त हाताने गुप्तपणे, मोठ्या मनाने व मनमोकळ्यापणाने उदार हृदयाने व उदात्त भावनेने, परहिताच्या

(पान क्र. २७ वर)

कर्म अधिक श्रेष्ठ की भाग्य अधिक श्रेष्ठ?

(भाग –२)

ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे

आपल्या मनी हीच हुर–हुर लागेल की, भाग्यविधाता परमात्मा माझे सात्त्विक असे स्वर्गीय दैवी भाग्य घडविण्यासाठी अवतरित झाला होता त्याच्या अवतरणाचा संदेश ही मजला प्राप्त झाला होता. परंतु मी मात्र केवळ दैहिक सुखात व्यस्त होऊन त्याकडे दुर्लक्ष केले. **बंधुनो, दैवी भाग्य प्राप्त करणाऱ्या पूजनीय आत्म्यांनी कालप्रवाहात पुजारी बनणे व पुनः पुजारी आत्म्यांनी संगमयुगावर अल्पावधीत आपल्या श्रेष्ठ कर्मांच्या द्वारे दैवी भाग्य प्राप्त करणे ही कल्प–कल्प चालणारी क्रिडा केवळ त्रिकालज्ञानी ब्रह्मावत्सच जाणतात. फलस्वरूप कल्प–कल्प तेच ह्या दैवी भाग्याचे अधिकारी बनतात.**

एखादा महान चित्रकार एखादे उत्तम चित्र रेखाटतो. त्याचे ते चित्र लाखो रुपयांना विकले जाते. आर्थिक प्राप्तिबरोबरच विश्वात नावलौकिक होणे हे त्यांचे भाग्य असले तरी ते भाग्य प्राप्त करण्यासाठी त्याला चित्र रेखाटण्याचे कर्म तर करावेच लागते. तद्वतच अभिनेत्यांनाही स्वतःच्या लोकप्रियतेबरोबरच चित्रपटांनाही लोकप्रियता प्राप्त करवून द्यावी लागते. अभिनय हे त्यांचे कर्म तर आर्थिक प्राप्ति व नावलौकिक प्राप्त होणे हे त्यांचे भाग्य होय! तीन तासांच्या अनेक चित्रपटात ते हिरो असले तरी ५००० वर्षांचा कालावधी असलेल्या चार युगांच्या चित्रपटात मात्र ते हिरोपार्टधारी नाहीत. **कोट्यावधी अभिनेते असलेल्या मनुष्यसृष्टीच्या विराट चित्रपटात हिरो पार्टधारी तेच आत्मे आहेत, जे मनुष्यसृष्टीच्या आदिपासून अंतापर्यंत ८४ जन्मांचा पार्ट बजावितात.** एखादा अभिनेता एखाद्या चित्रपटात श्रीकृष्णाची भूमिका इतकी प्रभावशाली करेल की, ती भूमिका पाहून भोळे भाबडे कृष्ण भक्त त्याच्यापुढे नतमस्तकही होतील. परंतु तो काही सत्ययुगात जन्म प्राप्त करु शकणार नाही. अर्थात त्यालाही सत्ययुगात जन्म प्राप्त करण्याचा अधिकार अवश्य आहे. परंतु त्यासाठी सत्यपरमात्म्याच्या सत्यज्ञानाच्या आधारे श्रीकृष्णाच्या ग्लानीरहित, निष्कलंक व चारित्र्यसंपन्न जीवनाचा अभ्यास करून त्याने आत्मपरिक्षण करावे की, मी आत्मा आपल्या वास्तविक जीवनात त्या श्रीकृष्णाप्रमाणे सर्व दैवी गुण संपन्न, पवित्रतेच्या सोळा कला संपन्न तसेच कामक्रोधादि विकारातून मुक्त, संपूर्ण निर्विकारी आहे काय? त्या नरश्रेष्ठाची भूमिका साकार करताना माझ्याही मुगुटात मोरपीस होते. त्या मोरपीसाचे आध्यात्मिक रहस्य मी जाणले आहे काय? सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्यापुढे माझे चित्रपट पाहून समाजाचे चारित्रिक पतन होणार नाही अशाच भूमिका मला स्विकाराव्या लागतील. अशा प्रकारे सर्व क्षेत्रातील मनुष्यात्म्यांना ईश्वरीय ज्ञान व राजयोगाची आवश्यकता आहे. कारण प्रत्येक मनुष्यात्मा हा त्या परमात्म्याचे संतान असल्याने त्याच्याद्वारे पावन व चारित्र्यसंपन्न बनणे हे प्रत्येकाचे परमकर्तव्य आहे. बंधुनो, कोणता मनुष्यात्मा ह्या ईश्वरीय ज्ञानाचा स्वीकार करेल हे सांगता येणार नाही. वास्तविक जीवनात खलनायक झालेल्या भूतपूर्व डाकू पंचमसिंगाने हे ईश्वरीय ज्ञान प्राप्त करून, खऱ्या अर्थाने वाल्याचा वाल्मिकी होण्याचा पुरुषार्थ केला आहे. तसेच अनेक चित्रपटात खलनायकाची प्रभावी भूमिका साकार करणारे मा. सुरेश ओबेरॉय ह्या ईश्वरीय ज्ञानयज्ञात कार्यरत आहेत. अर्थात तेही

आपले दैवी भाग्य प्राप्त करीत आहेत. **बंधुनो, भाग्य दैवी असो अथवा साधारण असो त्यासाठी कर्म करणे अपरिहार्य आहे. 'कर्म तसे फळ' ह्या नियमानुसार जे भाग्य प्राप्त होते** त्याविषयी सदा संतुष्ट राहून, हाच विचार करावा की, 'जे माझ्या भाग्यात आहे ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही व जे माझ्या भाग्यात नाही ते मला कोणीही देऊ शकत नाही.' अधिक उज्वल भाग्याची अपेक्षा असेल तर त्याप्रमाणे कर्म करणे आवश्यक आहे. कर्माशिवाय कोणतेही भाग्य प्राप्त होत नसल्याने, कर्म हे भाग्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे' असे म्हणणे क्रमप्राप्त आहे.

ज्याप्रमाणे मनुष्यात्मा अनेक जन्म प्राप्त करताना सतो, रजो व तमो गुणाच्या चक्रातून फिरत असतो. तद्वतच ही मानवी सृष्टीही उत्पत्ती व लयाच्या कालावधीत ह्या चक्रातून पार होत असते. बंधुनो, ह्या मानवी सृष्टीचा हा **अलिखीत नियम आहे की, जो पर्यंत समाजात रजोगुण व तमोगुण निर्माण होत नाही, तोपर्यंत कोणत्याही मनुष्याच्या आंतर्आत्म्यात आध्यात्मिक ज्ञानाची निर्मिती होऊ शकत नाही. सत्ययुग, त्रेतायुगात हे गुण अंशमात्रही नसल्याने तेथील दैवी समाजाला आध्यात्मिक ज्ञानाची आवश्यकता नसते.** त्रेतायुगाच्या समाप्तीनंतर मात्र द्वापरयुगात रजोगुण तर कलियुगात तमोगुण निर्माण झाल्यामुळे समाजातील मनुष्यांचे आत्मिक पतन होऊन, पवित्रता नष्ट होऊ लागल्याने, त्याला प्रतिबंध करण्यासाठी भिन्न-भिन्न काळातील, भिन्न-भिन्न धर्मसंस्थापकांनी, ऋषीमुनींनी व संतमहात्म्यांनी आपल्या आध्यात्मिक ज्ञानाद्वारे तत्कालीन समाजाला बहुमूल्य मार्गदर्शन केले. फलस्वरूप समाजाच्या आत्मिक पतनाचा वेग काही काळ निश्चितपणे मंदावला गेला. हे आत्मिक पतन भविष्यातही होऊ नये म्हणून त्यांनी भिन्न-भिन्न आध्यात्मिक ग्रंथांची निर्मिती केली. शेकडो वर्षानंतरही आजकालचे आध्यात्मवादी गुरु अथवा विद्वान पंडित गीता, बायबल, वेद, कुराण, ज्ञानेश्वरी, दासबोध व संत तुकारामांची गाथा इत्यादि ग्रथांचा अभ्यास करून, त्यावर प्रवचन करीत आहेत. विकर्मे अथवा षड्रिपुंच्यापासून समाजाला दूर करून त्याची आत्मोन्नती साधणे हे संतमहात्म्यांचे महान कर्म तर 'मरावे परि कीर्तिरुपे उरावे' हे त्यांचे अलौकिक भाग्य नव्हे काय? सामान्यांचे असते लौकिक भाग्य, तर असामान्य महात्म्यांचे असते अलौकिक भाग्य! महात्मा गांधींनीही स्वातंत्र्याच्या संग्रामात महत्त्वपूर्ण भूमिका बजाविल्यामुळे त्यांना 'राष्ट्रपिता' ही महान पदवी प्राप्त झाली. कोट्यावधी कागदी चलनावर आपण त्यांचे चित्र पहात आहोत. देशासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याचे कर्म करणे हाच त्यांच्या अलौकिक भाग्याचा आधार आहे.

बंधुनो, कर्म आणि भाग्य आपआपल्या स्थानावर असले तरी कर्माचे स्थान प्रथम व श्रेष्ठ आहे. तर भाग्य द्वितीय स्थानावर आहे. कर्माच्या पश्चात कर्मफळाची प्रतिक्षा मनुष्यात्म्याला करावी लागते. परंतु तो कर्मफळावर आपला अधिकार तात्काळ प्राप्त करू इच्छितो. **म्हणून गीतेतही म्हटले आहे की, 'हे पार्थ, तुझा कर्मावर अधिकार आहे, कर्मफलावर नाही' हे महावाक्य उच्चारण्याचा उद्देश हाच आहे की, कर्म केल्यानंतर त्याचे फळ अर्थात भाग्य तात्काळ प्राप्त होतेच असे नाही.** तात्काळ प्राप्त झालेले भाग्य अशाश्वतही असू शकते. लोभवश केलेले कर्म तर निश्चितपणे अशाश्वत व घातक होऊ शकते. ह्या लोभवश कर्मामुळे अलिशान गृहात निवास करणाऱ्या कोट्याधीशांनाही कारागृहात बंदिस्त होण्याची वेळ येते. म्हणून म्हटले आहे 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.' मुख्य पराधीनता आहे ती पाच मनोविकारांची! विकारांची ही पराधीनता समाप्त करून, स्वाधीनतेचे संस्कार दृढ करण्यासाठी परमात्मा प्रत्येक मनुष्यात्म्याला श्रीमतानुसार कर्म करण्याची आज्ञा देत आहे. योगयुक्त होऊन श्रीमतानुसार कर्मे केल्याने आत्मा कर्मेंद्रियांचा राजा बनतो. विकारांच्या अधीन होण्याची त्याची वृत्ती समाप्त होते. कर्मेंद्रियांवर राज्य करण्याचे संस्कारच राजयोग्याला सत्ययुगी राजाईचे भाग्य प्राप्त करवून देतात. इतकेच नव्हे तर द्वापर-कलियुगातील विकाराधीन राजे सत्ययुगातील निर्विकारी

महाराजाच्या जड मूर्तीचे पूजन करतात. ह्या महाराजांनाच परमात्म्याने 'राजाओंका राजा' म्हटले आहे. अशाप्रकारे पुरुषोत्तम **संगमयुग हे 'राजाओंका राजा' बनण्याचे व कल्पातील ८४ जन्मांचे भाग्य प्राप्त करण्याचे युग असल्याने, ह्या युगावरील कर्मांना असाधारण महत्त्व आहे.** संगमयुगावरील ह्या हिरेतुल्य संधीचा लाभ विश्वपरिवारातील सर्व मनुष्य आत्म्यांनी अवश्य प्राप्त करावा. हीच परमपित्याची, ब्रह्माबाबांची व आम्हा ब्रह्मावत्सांची कल्याणकारी शुभभावना आहे. आपण सर्व मनुष्यात्मे त्या परमपित्याची अनादि काळापासून संतान असल्याने, आपण सर्वजण एकमेकांचे सख्खे भाऊ तर आहोतच ह्याशिवाय विश्वातील सर्व स्त्री-पुरुष पिताश्री ब्रह्मा व मातेश्वरी सरस्वती ह्यांची अलौकिक संतान असल्याने, आपण एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण देखील आहोत. विश्वातील सर्व मनुष्यात्म्यांच्या कल्याणार्थच भाग्यविधाता परमात्मा अवतरित झाला आहे. भाग्यविधाता त्यालाच म्हणावयाचे जो विश्वाचे व विश्वातील साधारण नर नारींनाही दोन युगांसाठी शाश्वत व सुखशांती संपन्न असे दैवी भाग्य प्राप्त करवून देतो. **ह्या दुर्लभ भाग्यासाठी परमात्म्याने अत्यंत बहुमूल्य असे महावाक्य उच्चारले आहे की, 'आपके एक कदममे पद्मोंकी कमाई है।'** ह्या अलौकिक प्राप्तींसाठी पुरुषार्थ करीत असताना, कलियुगी विषयविकारांच्या भवसागरातही राजयोगी आत्मा, बंधनमुक्त जीवनाचे व अव्यक्त परमात्म्याच्या द्वारे अतींद्रिय सुखाचे सर्वोच्च भाग्यही प्राप्त करू शकतो. त्याची सुखशांती व एकरस स्थिती कोणाही देहधारी मनुष्यावर अथवा निर्माण होणाऱ्या साधक बाधक परिस्थितीवर अवलंबून नसते. राजयोगी आत्मा आपले प्रत्येक कर्म ज्ञानयुक्त, योगयुक्त व युक्तियुक्त होऊन करीत असल्याने, त्याचे संगमयुगी भाग्य व जीवन हिरेतुल्य बनते. ह्या अल्पकालीन युगावर केलेल्या कर्मांच्याआधारे निर्माण होणाऱ्या प्रदीर्घ कालीन सत्ययुगी दैवी भाग्याला मात्र परमात्म्याने सुवर्णतुल्य म्हटले आहे. **बंधु, भगिनी व मातांनो, अशाप्रकारे 'कर्म अधिक श्रेष्ठ की भाग्य अधिक श्रेष्ठ?' ह्या विषयावर जे निरूपण केले आहे. ते लक्षात घेता तुमच्याही बुद्धीचा निर्णय हाच होईल की, भाग्यापेक्षाही कर्म अधिक श्रेष्ठ आहे.**

***

(पान क्र.१५ वरून)

शिवबाबांनी आपल्याला ज्ञानधनाची संपत्ती दिली आहे. ज्ञान धनापुढे हे स्थूल धन (पैसा) धुळीप्रमाणे आहे.

यज्ञामध्ये बैगरी पार्ट (Beggary Part) आला १९५१ साली. मे १९५० मध्ये संस्था मा. आबूला आली. आबूचे हवामान काही जणांना मानवले नाही. कराची, हैद्राबाद गरम हवेची ठिकाणे याउलट मा. आबू थंड हवेचे ठिकाण यांच्याकडे इतके गरम कपडे नव्हते. बरेच जण आजारी पडले. जे पैसे घेवून आले होते, ते ट्रेन आणि बोटीने येण्यात खर्च झाले. ज्यांनी आबूचे निमंत्रण दिले होते, बाबा या आम्ही मदत करु तुम्हाला. त्यांनी चालाखी केली. त्यांनी मदत दिली नाही. त्यांना वाटले की आम्ही मदत केली नाही तर ही संस्था नामशेष होईल. म्हणून कोणी काहीही सहयोग दिला नाही. परंतु ब्रह्माबाबांची ती अचल, एकरस, अडोल स्थिती बिल्कुल निश्चिंत .... डोक्याखाली एक हात ठेवून पहाडावर झोपत असत जसा बेफिकर बादशाह! एका बाजूला सगळ्यांना आजाराने घेरले - दुसऱ्या बाजूला साधन-सुविधा संपून चालल्या, पैसे शिल्लक नाहीत आणि ३००-४०० भाई बहिणी खाणारे. बाबा सांगत कोणाकडे हात पसरण्यापेक्षा मेलेले बरे! खूप मोठा पेपर होता. बाबांची मात्र निश्चिंत स्थिती. बाबा सांगायचे, 'मुलांनो वर्तमानपत्रात लिहा. सर्वात श्रीमंत ब्रह्माकुमारी संस्था आहे. मुलांनो तुमच्याकडे एवढे किंमती ज्ञान, गुण, शक्तींचे धन आहे. या धनापुढे तर ते स्थूल धन धुळीप्रमाणे आहे ! हे धन वाटा'. बाबांनी सर्वांना नशा चढविला. ज्यांना नशा चढला, ते सेवेमध्ये लागले. बाबा परिक्षा सुद्धा विचित्र घेत असत. सगळे आजारी आहेत आणि बाबांचा संदेश आला. मुलांना ताक आणि ज्वारीची भाकरी जेवणात द्या. ज्यांना संशय आला की बाबा तर असे सांगणारच नाहीत. ते तर यज्ञ सोडून

पळून गेले. अनन्य मुले तेवढी राहिली. बाबांचा नशा, मस्ती इतकी की बाबांना कोणी काही बोलूच शकत नव्हते. बाबांनी कधीही मुलांना उपाशी झोपू दिले नाही. कुठून ना कुठून पैसा यायचा. मनीऑर्डर यायची, ११ वाजता जाऊन भाजीपाला, धान्य आणले जायचे आणि २ वाजता जेवण तयार होत असे. दिवसात एकदा तरी पूर्ण जेवण मिळत असे. असा हा पार्ट जवळजवळ एक वर्ष चालला.

वरिष्ठ दादी सेवेसाठी बाहेर पडल्या. एक ही पैसा हातात नाही आणि कानपूर, लखनौला गेल्या-सेवेसाठी तिकीट, पैसा, कपडे नाही. एक ड्रेस बॅगेत भरला आणि निघाल्या. कशी स्थापना झाली सेंटर्सची! जर इतिहास ऐकलात तर तुम्हाला अक्षरशः रडायला येईल. मन भरुन येईल. ईश्वरीय सेवेविषयी अतूट प्रेम व निश्चय दादींचा ! दादींना पाहिल्यावर वाटे साक्षात देवीच जणू काही ! अनेकांना तसे अनुभव येत. सेंटर उघडायला सुरुवात झाली. एकदा एक मातेला, वाटले की स्वंयपाकघरात जाऊन पहावे की यांच्या भंडाऱ्यात काय आहे? पाहिले तर फक्त मीठाची बरणी आणि काही छोटे-छोटे बटाटे होते. बाकी काहीच नाही ! बटाटा शिजवून, मीठ टाकून रस्सा बनवून खात. बस झालेच जेवण ! आणि जे काही मिळत असे ते मधुबनला बाबांकडे पाठवत असत. दादींना वाटे-मधुबनमध्ये इतके भाई-बहिणी आहेत. ते उपाशी रहाता कामा नयेत. त्यांना चिंता होती. बाबांची आणि बाबांना चिंता होती मुलांची ! यज्ञामध्ये अनेकांचे तन-मन-धन लागून यज्ञ स्थापन झाला. एका दादीला कोणी टरबूज (कलिंगड) दिले विचार केला की मी हे किती दिवस खाणार? कोणाला देणार? हे जर मी बाबांना पाठविले. तर तिथे सर्व मुलं खातील. पण हे कसे पाठवणार? माहीत नव्हते तिने चाकूने त्यावर लिहिले. ब्रह्माकुमारीज मा. आबू, राजस्थान. एका भावाला सांगितले की आबूला जाणाऱ्या ट्रेनमध्ये हे कलिंगड पोचव व कोणाला तरी यज्ञात पोचवायला सांग. त्याप्रमाणे ते कलिंगड गाडीतून आबूला आले. बाबांनी जेव्हा ते पाहिले तेव्हा त्यांचे अंतःकरण प्रेमाने भरुन आले. आज किती सेवाकेंद्र उघडले. हे सर्व त्यागामुळे घडले. सफल करविले बाबांनी.

काही जणांकडे धन आहे पण सेवेमध्ये लावत नाहीत. काही जणांकडे घरं आहेत, पण स्वतः जिवंत असताना. यज्ञाच्या नावाने करीत नाहीत. म्हणतात-दीदी मी आहे ना ! इतक्यात काय मी मरणार नाही आणि कोणी अचानक शरीर सोडतात. मेल्यानंतर दूरचे संबंधी ही त्या संपत्तीवर (घरावर) हक्क सांगण्यासाठी येतात. एका अनन्य भावाने ३/४ मजली भवन सेंटरसाठी बनविले. प्रकाशमणी दादी, वरिष्ठ भ्राता रमेशभाई सांगत असत की बाबारे, तू यज्ञाच्या नावाने हे भवन कर. तो बोलत असे अरे, मी बसलो आहे ना! हे सर्व बाबांचेच आहे. तुम्ही माझ्यावर विश्वास का नाही ठेवत? तेथे सेंटर चालू होते अचानक हार्टफेलने तो भाऊ गेला. तो गेल्यावर त्याचे दूरचे नातवाईकही हक्क सांगायला आहे. संस्थेकडे काही कागदपत्रे नव्हती. काय करु शकत होते? काही नाही, एका महिन्यात ते भवन रिकामे करावे लागले. **तात्पर्य म्हणजे 'जो करना है अब कर ले । यह वक्त जा रहा.....' ईश्वरीय सेवेत आपले तन-मन-धन-समय, श्वास, संकल्प सफल करा-सफल करा...**

(भावानुवाद : ब्र. कु. मीनाक्षी बहेन, ठाणे (पू.)

***

(पान क्र.२३ वरून)

मंगलकामनेने व सुखदानाच्या श्रेष्ठ संकल्पाने विश्वकल्याणाच्या ध्येयाने व परोपकाराच्या ध्येयाने केलेली सेवा असंख्य पटीने पुण्याची वृद्धी करविते आणि तिन्ही काळात तिन्हीं लोकात अमर बनवते. जर सेवेत निमित्त व निर्माण भाव असेल तर जणू दुधात साखरच. **नम्र व निरहंकारी बनून केलेली सेवा शिवपित्यासमान विश्व सेवक बनवते व जनता जनार्दनाच्या मन मंदिरात पूजनीय बनण्याचे भाग्य देते. तर मग करुया निरंतर निःस्वार्थ सेवा, घेऊ या सर्वांचे आशीर्वाद, खाऊया खुशीचा खवा व मिळवू या आत्मिक सुखाचा मेवा.**

***

❖ आपले जीवन श्रेष्ठ बनविण्यासाठी तीन–तीन श्रेष्ठ शिकवणी ❖

१.	तीन गोष्टींना ओळखा	–	स्वतःला, परमात्मा पित्याला, सृष्टिचक्राला
२.	तीन गोष्टींचे स्वरुप बना	–	मन्मनाभव, मध्याजीभव, मामेकम्
३.	तीन गोष्टीं सदा सोबत ठेवा	–	साधेपणा, स्वच्छता, पवित्रता
४.	तीन गोष्टींकडे लक्ष द्या	–	स्वचिंतन, प्रभुचिंतन, सेवेचे चिंतन
५.	तीन गोष्टीत डबल बना	–	डबल लाईट, डबल अहिंसक, डबल ताजधारी
६.	तीन गोष्टींचा आत्मिक नशा बाळगा	–	त्रिनेत्री, त्रिकालदर्शी, त्रिलोकीनाथ
७.	तीन गोष्टींना घाबरु नका	–	परिस्थिती, मायेचे वादळ, ड्रामा
८.	तीन गोष्टी लक्षात ठेवा	–	संगमयुग, शिवबाबा, स्वदर्शनचक्र
९.	तीन लोकात भ्रमण करा	–	ब्रह्म लोक, सूक्ष्म लोक, साकार लोक
१०.	तिघांवर दया करा.	–	स्वतःवर, विश्वातील आत्म्यांवर, प्रकृतीवर
११.	तिघांशी वाद घालू नका.	–	क्रोधीशी, मोठ्यांशी, संत–महात्म्यांशी
१२.	तीन मंत्रींवर नियंत्रण ठेवा	–	मन, बुद्धी, संस्कार
१३.	तीन गोष्टींवर राज्य करा	–	स्वतःवर, दुसऱ्यांच्या हृदयावर, विश्वावर
१४.	तीन स्मृती पक्क्या करा	–	ब्राह्मण, फरिश्ता, देवता
१५.	तीन गोष्टी धारण करा	–	सत्यता, स्वच्छता, सभ्यता
१६.	तीन प्रकारचे बादशहा बना	–	बेफिकर बादशहा, बेगमपूरचा बादशहा, बिनकवडी बादशहा
१७.	तीन स्थितीत संपूर्ण बना	–	निराकारी, निरहंकारी, निर्विकारी
१८.	तीन गोष्टींचे दान द्या	–	ज्ञानदान, गुणदान, शक्तींचे दान
१९.	तीन प्रकारची सेवा करा	–	मनसा, वाचा, कर्मणा
२०.	तीन बिंदू लक्षात ठेवा	–	आत्मा, परमात्मा, ड्रामा
२१.	तीन गोष्टी सदा सोबत ठेवा	–	उमंग, उत्साह, खुशी
२२.	तीन गोष्टींचा त्याग करा	–	आळस, निष्काळजीपणा, बहाणेबाजी
२३.	तीन गोष्टी करु नका	–	संगदोष, अन्नदोष, डिससर्विस
२४.	तिघांचे परिवर्तन करा	–	स्वतःचे, परिवाराचे, विश्वाचे

आरोग्याचे रहस्य

आपले मन जसे विचार करते तसे आपण बनतो. त्यामुळे स्वतःला कधीही रोगी समजू नका. मी नक्कीच बरा (स्वस्थ) होईल, ही इच्छा सोडू नका. आपला आजार हमखास बरा होईल व आपल्याला नवजीवन प्राप्त होईल, हा विश्वास बाळगा. दुःखाचे वादळ जरी आले तरी स्वयं भगवान आपल्याबरोबर आहे, हे महान भाग्य आठवून, सदैव हर्षित रहा. स्वतःला देहापासून भिन्न, आत्मा समजून आपले मन परमात्मा शिव पित्याशी (शिवबाबांशी) जोडा. शरीराला जशी औषधाची गरज आहे तशीच आपल्या मनाला परमात्म स्मृतीची गरज आहे.

प्रत्येक पावलागणिक जर शिवबाबांची याद असेल तर आपण कोणत्याही आजारापासून सहजच मुक्त होऊ. आपल्या मनाला अचल ठेवणारे, पुन्हा निरोगी शरीर अवश्य प्राप्त करतील. फक्त हिंमत कधी सोडू नका व सदैव खुशीत रहा. म्हणजे रोग कसाही असला तरी तो दूर होईल. आपल्या मनात सदैव ईश्वरीय ज्ञानाचा दीप तेवत ठेवा म्हणजे कुठलीही समस्या, एक खेळ अनुभवाला येईल.

***

सकारात्मक विचार व सकारात्मक दृष्टिकोन यांचे जीवनातील महत्त्व

ब्र. कु. भगवानभाई, शांतिवन, आबू रोड

सकारात्मक विचारांशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आपल्याला जीवनात पसरलेला नैराश्याचा अंधःकार सकारात्मक विचारांनीच दूर करता येतो. तसेच पुन्हा नव्याने जीवन जगता येते. त्यामुळे आपण आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवून, नेहमी सकारात्मक विचार करण्याकडे लक्ष देणे, गरजेचे आहे.

आपल्या मनामध्ये दोन प्रकारचे विचार उत्पन्न होतात – १) सकारात्मक विचार २) नकारात्मक विचार. मनात उत्पन्न होणाऱ्या विचारावर आपला दृष्टिकोन तसेच व्यवहार अवलंबून असतो. त्यामुळे जसे आपण विचार करतो तसेच बनत जातो. उदाहरणार्थ आपण जर काळ्या रंगाचा चष्मा लावला तर सर्वत्र काळे दिसेल व लाल रंगाचा चष्मा लावला तर सर्वत्र लाल दिसेल. त्याचप्रमाणे नकारात्मक विचारांमुळे आपल्याला दुसऱ्यातील कमी-कमजोरी, अवगुण तसेच सर्वत्र पसरलेले नैराश्य, दुःख, अशांती याच गोष्टी दिसतील. याउलट सकारात्मक विचारांनी आपल्याला दुसऱ्यांच्या विशेषता, त्यांच्यातील गुण व सर्वत्र सुख, शांती, समाधान दिसून येईल. तात्पर्य म्हणजे जेव्हा आपण सकारात्मक विचारांचा चष्मा लावतो तेव्हा आपल्याला प्रत्येक मनुष्य चांगला दिसतो. या अनुषंगाने युधिष्ठिर व दुर्योधन यांची गोष्ट आपण जाणतो. युधिष्ठिरला कुठेही वाईट मनुष्य दिसला नाही. याउलट दुर्योधनाला कुठेही चांगला मनुष्य सापडला नाही. याला कारण म्हणजे युधिष्ठिरचा सकारात्मक दृष्टिकोन व दुर्योधनचा नकारात्मक दृष्टिकोन.

सकारात्मकतेची सुरुवात ही आशा आणि विश्वासाने होते. कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास गमवता कामा नये. त्याचबरोबर सदैव आशावादी बनून, जीवन जगले पाहिजे. जसे एखाद्या ठिकाणी सर्वत्र अंधःकार पसरला असतांना, आपण तेथे एखादा दिवा लावला तर क्षणार्धात अंधःकार दूर होतो. त्याचप्रमाणे मनात आशेचा दीपक जागृत केल्याने, नकारात्मक विचारांचा अंधःकार दूर होऊन जातो. सकारात्मक विचार हे नकारात्मक विचारांचा अंधःकार मिटवू शकतात. त्यामुळे मनात नकारात्मक विचार येताच, पटकन सकारात्मक विचार निर्माण करा. सकारात्मक विचारांनी भरलेले मन हे सदा स्वस्थ असते.

आपल्याला जर जीवनात सदा सुखी व आनंदी रहायचे असेल तर नेहमी सकारात्मक विचारांचीच सोबत करा. या सृष्टीवर दोन प्रकारच्या ऊर्जा नेहमी कार्य करतात. चांगल्या आणि वाईट, योग्य आणि अयोग्य, सुखदायी-दुःखदायी, सकारात्मक आणि नकारात्मक ... परंतु आपण कोणत्या गोष्टीकडे आकर्षित व्हायच हे स्वतःच ठरवायचे असते. वास्तविक सकारात्मक विचारांमध्ये प्रचंड शक्ती सामावलेली असते. सकारात्मक विचारांमुळे मनाला शांत व आनंदमय स्थितीचा अनुभव होतो. याउलट नकारात्मक विचारांना अंतच नसतो. नकारात्मक विचार करणारी व्यक्ती हे असे का, तसे का .... म्हणत-म्हणत आणखीनच विचारांच्या दलदलीत फसत जातो.

तसे पाहिले तर मेंदू हा विचारांना निर्माण करण्याचा एक कारखाना आहे. परंतु हा कारखाना मनाच्या नियंत्रणाखाली सतत कार्यरत असतो. जर का मनच नकारात्मक विचारांनी ग्रासित झाले तर त्याचा विपरीत परिणाम मेंदूरुपी कारखान्यावर होतो. तेथे मोठ्या प्रमाणावर नकारात्मक विचार निर्मित होतात. अशा प्रकारच्या नकारात्मक

विचारांमुळे जीवनात नैराश्य, असंतुष्टता अनुभवाला येते. म्हणूनच जीवनात सदा शांती, संतुष्टता, प्रसन्नता हवी असेल तर सदैव सकारात्मक विचारांची सोबत करा.

जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट आहे सकारात्मक दृष्टिकोन. बाकी तुमच्यातील कला, गुण, शिक्षण, धन-संपत्ती ... या सर्व गोष्टी दुय्यम स्वरुपाच्या आहेत. कोणीही आपला पार्ट (विश्वनाटकातील भूमिका), आपले नातेवाईक, कुटुंब-परिवार बदलू शकत नाही. परंतु आपण आपला दृष्टिकोन मात्र बदलू शकतो. सकारात्मक दृष्टिकोन असेल तरच सर्व गोष्ट योग्यरीतीने घडत असतात. तात्पर्य म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे नकारात्मक गोष्टी सांगणाऱ्यांपासून नेहमी दूर रहा. केवळ सकारात्मक लोकांची संगत ठेवा. आपल्या घरातील, ऑफिसमधील, लौकिक व अलौकिक परिवारातील सर्वांविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.

आपले आयुष्य हे विचारांवर अवलंबून असते. आपल्या मनामध्ये दिवसभरात (२४ तासात) सुमारे ६० हजार विचार येत असतात. त्यातील ६० ते ७०% विचार नकारात्मक असतात. ज्यावेळी आपण नकारात्मक विचार करतो त्यावेळेस विश्वातील नकारात्मक तरंगांशी आपण जोडले जातो. परिणामता नकारात्मक विचारांची गर्दी आपल्या भोवती जमा होते व उदासिनता, असफलता, भय, विकार इत्यादी गोष्टींकडे आपली वाटचाल सुरू होते. जसे रेडिओ किंवा टी. व्ही. चॅनेल आपण सेट करताच, त्याचे प्रक्षेपण लगेच सुरु होते. म्हणूनच नकारात्मक विचारांना लगेचच सकारात्मक करणे, अत्यंत आवश्यक असते. यालाच मनाचे मनाशी युद्ध करणे असे म्हटले जाते. या अनुषंगाने संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे - 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ...'

एकदा नेपोलियन समुद्र किनाऱ्यावर जहाजातून उतरताना, सैन्यासमोर पाय घसरून चिखलात छातीवर आडवे पडले. नेपोलियनची छाती चिखलाने माखली. तेव्हा त्यांच्या सैनिकांना वाटले की आपला सेनापती आडवा पडला म्हणजे आज युद्धात आपला पराभव नक्की होणार. त्यामुळे सैनिक भयभीत झाले. ही गोष्ट नेपोलियनच्या लक्षात आली. तेव्हा ते चटकन चिखलातून उठले आणि छाती झटकत सैनिकांना म्हणाले, 'मित्रांनो, आज आपण हमखास युद्ध जिंकणार कारण आपण येथे येताच भूमीने मला अलिंगन दिले आहे. ती म्हणाली की मी तुमची आहे व तुम्ही माझे आहात.' नेपोलियनच्या या सकारात्मक विचारामुळे सैनिकांचे मनोबळ वाढले व त्यांचा युद्धात विजय झाला. ही आहे सकारात्मक विचारांची किमया!

याठिकाणी दुसरा एक उद्‌बोधक प्रसंग नमूद करावासा वाटतो, एकदा गौतम बुद्धांकडे त्यांचा एक शिष्य धापा टाकत-टाकत आला आणि म्हणाला की, मला गावकऱ्यांनी खूप शिवीगाळ केली. तेव्हा बुद्ध म्हणाले की, बरं झाल त्यांनी तुला मारलं नाही. त्यावर तो शिष्य म्हणाला की, त्यांनी मला मारहाण देखील केली. तेव्हा बुद्ध म्हणाले, त्या मारामुळे तुला जखम तर झाली नाही ना? शिष्य म्हणाला, माझं डोक फुटलं आहे. त्यावर बुद्ध म्हणाले, बरं झालं तेवढ्यावर निभावलं. तुझा मृत्यू तर झाला नाही! हे ऐकून तो शिष्य बुद्धांजवळ जाऊन शांत बसला. गौतम बुद्धांना हेच सांगायच होतं की, जी घटना घडली त्यापेक्षाही वाईट घटना घडू शकली असती. पण ती घडली नाही. यातच समाधानी रहा.

जसे शरीराला रोज चांगल्या अन्नाची गरज असते तसेच आपल्या मनालाही उत्तम विचारांची गरज असते. यातले महत्त्वाचे शब्द आहेत 'चांगलं' अन्न आणि 'उत्तम' विचार. आपल्या शरीराला नेहमी कदान्न दिले, मनाला घाणेरडे विचार पुरवले तर रोगी शरीर आणि रोगट मन याशिवाय काय निष्पन्न होणार? मनाला सदृढ ठेवण्यासाठी चांगल्या सकारात्मक विचारांची गरज असते. सत्य प्रामाणिक आणि चांगल्या, सकारात्मक गोष्टींचा ध्यास घेतला की आपला दृष्टिकोन आपोआपच सकारात्मक बनत जातो.

तात्पर्य म्हणजे वर्तमान समयी प्रत्येक मनुष्याला सकारात्मक विचारांची अतिशय गरज आहे. सकारात्मक विचार हेच मानवाच्या बुद्धीचे शक्तिशाली

(पान क्र. ३२ वर)

व्यसनमुक्ती, मनोनिग्रह आणि राजयोग

ब्र.कु. डॉ. दिलीप कौंडिण्य, एम्.डी., ठाणे

स्वतःच्या पदरचा पैसा खर्च करून सुन्न होणे व परिणामी दुःखी होणे यालाच व्यसन म्हणतात. सध्याच्या काळात पगार कमी व महागाई जास्त अशी परिस्थिती आहे. म्हणजेच व्यसन करणे कधीच परवडणारे नाही. स्वस्त दारु घेतली तर गटारात किंवा फुटपाथवर लोळावे लागते. मध्यम प्रतीची दारु घेतली तर लिव्हर (Liver) खराब होते. अगदीच स्वस्त व मस्त गुटका किंवा तंबाखू खाल्ली तर दोन-तीन वर्षात कॅन्सर होतो. सिगरेटी फस्त कराव्या तर कायमचा खोकला होतो आणि पाच-दहा वर्षात फुफ्फुसाचा कॅन्सर होतो. पिज्झा, बर्गर, कोला यांचे देखील व्यसन निर्माण होते, **असे सिद्ध झाले आहे. पिज्झा व बर्गर यांच्यामुळे आतड्यांचा कॅन्सर होतो. खूप प्रमाणात साखर खाल्ल्याने, लठ्ठपणा येतो. कोको मधील पोटॅशियम बेंझोयेट, सॅन्डवीच मधील व्हिटॅमिन बी मुळे विघटित होते. मग बेंझोयेट मिठातील, सोडियमची संगत करून कॅल्शियमला तत्क्षणी तलाक देतो. या अनिष्ट संगतीमुळे सोडियम बेंझोयेट नावाचे अत्यंत घातक असे कॅन्सर निर्माण करणारे रसायन (Carcinogen) तयार होते.** पण आजचा माणूस म्हणतो की सचिन, विराट और धोनी तो पीते है। तो हम क्यों न पिये? वास्तवात या सर्व मोठ्या माणसांना फक्त येणाऱ्या धनराशीची झिंग असते. पद्मभूषण गोपीचंद पुल्लेलासारखे फारच थोडे असतात; जे परखडपणे सांगतात की,'मी दूध पितो. त्यामुळे अशा घातक पेयांची जाहिरात मी करणार नाही.' या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या बॅडमिन्टनपटूने मेडल आणून देणारी पी. व्ही. सिंधू घडवली आहे.

सन २०१२ मध्ये स्वास्थ्य संचालनाद्वारे एक स्वतंत्र एन. सी. डी. (Non Communicable Diseases) विंगची स्थापना झाली. परंतु तरी देखील हृदयरोग, स्मृतिभ्रंश, मधुमेह व कॅन्सर सारखे एन.सी.डी. भयानक रित्या वाढतांना दिसत आहेत. सदर पाहणीच्या आधारावर ब्रह्माकुमारीच्या वैद्यकीय शाखेने काही S.I.G. (अर्थात Special Interest Group) तयार केले आहेत. डॉ. सचिन परब हे व्यसनमुक्तीचे कार्य करीत आहेत. डॉ. सतीश गुप्ता हे राजयोगाच्या प्रयोगाद्वारे हृदयरोग्यांना महागड्या स्टेन्ट व बायपासपासून सुटकारा देत आहेत. डॉ. साहू यांनी मधुमेह मुक्तीचे कार्य हाती घेतले आहे. डॉ. अशोक मेहता हे कॅन्सर मुक्तीसाठी कार्यरत आहेत.

आज एन. सी. डी. सारखे रोग तसेच व्यसनाधिनता या गोष्टी केवळ मनावर ताबा (मनोनिग्रह) नसल्यामुळे होत आहेत. मधुमेहाच्या रुग्णाला सांगा 'गोड खाऊ नका' तर तो मनावर संयम न ठेवता चार-पाच लाडू फस्त करतो. दारुचे व्यसन असलेल्या माणसाला सांगा की दारुचे एक-दोन पेग घेतल्याने स्वास्थ्य बिघडत नाही. परंतु तो मात्र 'ये दिल माँगे मोर' या उक्तीप्रमाणे पाच-सहा पेग रिचवतो. **त्याला जर विचारले की तू असं का करतो? तर त्याचे उत्तर असते - 'दिल है की मानता नहीं...'** त्यामुळेच एखाद्या भ्रष्ट व्यक्तीने १०० कोटीचा भ्रष्टाचार केला की एकदम २००० कोटीचा भ्रष्टाचार करण्याची त्याला तहान लागते.

प्रत्येक बसवर लिहिलेले असते 'मनावर ताबा हाच उत्तम ताबा'. पण मनावर नियंत्रण कोठेच नाही. याचे मुख्य कारण म्हणजे 'आध्यात्मिक शून्यता' आहे. अध्यात्म मनाला शक्तिशाली बनवते. परंतु आज सर्वत्र आध्यात्मिक

शून्यता पहायला मिळते. परिणामतः माणसाचे मन अशक्त झाले आहे. त्यामुळे ते पटकन प्रलोभनांच्या व व्यसनांच्या आहारी जाते. परिणामी काय बरोबर आहे व काय चूक आहे, याचा विचारच तो करीत नाही. मग माणूस परमेश्वराचा मार्ग सोडून सैतानाच्या मार्गावर चालणे सुरू करतो. क्षणिक विकारी सुख भोगतो आणि शेवटी एडस्सारख्या भयानक व्याधीचा बळी ठरतो किंवा दुर्धर व्यसनाचा बळी होतो.

आज अमेरिकन लोकांनी मनःशक्ती वाढविण्यासाठी अनेक महागडे पॅकेज बाजारात आणले आहेत. ते सर्व अपयशी ठरत आहेत. अनेक प्रकारचे सत्संग बाजारात आले. त्यापासून मनुष्याला थोड्या वेळापुरते मनःस्वास्थ्य मिळते. परंतु मूळ वृत्तीत बदल घडत नाही. परंतु **ब्रह्माकुमारीज्च्या कुठल्याही सेवाकेंद्रावर गेल्यावर ज्ञानमुरलीतून शिव परमात्मा हेच सांगतात की 'जशी तुमची स्मृती तशी तुमची वृत्ती, जशी वृत्ती तशी दृष्टी व जशी दृष्टी तशी सृष्टी' त्यामुळे मुरलीत वारंवार सांगितले जाते की तुमची दृष्टी आत्मिक, सिव्हील (पवित्र) बनवा.** त्यासाठी प्रथम ही स्मृती असली पाहिजे की मी श्रेष्ठ आत्मा आहे. तसेच दुसऱ्यालाही आत्मा समजून त्याच्याशी भ्रातृत्व भावनेने सद्व्यवहार केला पाहिजे. यासाठी आवश्यक आहे निरंतर परमात्मा शिव पित्याची याद (स्मृती). तात्पर्य म्हणजे या तमोप्रधान, पतित, विकारी कलियुगात याद द्वारेच विकार व व्यसनांचा आघात मनावर होणार नाही. तसेच शिव परमात्म्याच्या याद द्वारे विकर्म दग्ध होतात व आत्मा ईश्वरीय ज्ञान, गुण व शक्तींनी भरपूर होतो, असा लेखकाचा स्वानुभव आहे. त्याचबरोबर बी. के. मेडिकल विंगकडे अशी काही उपकरणे आहेत ज्यांच्याद्वारे आत्म्याची वाढलेली शक्ती ही वाढत जाणारा ऑरा किंवा शक्ती वलयाद्वारे दिसून येते. मुख्य म्हणजे राजयोगाच्या अभ्यासाने मनाची प्रसन्नता वाढविणारे स्त्राव तयार होतात. फलस्वरुप मनुष्याला व्यसन करण्याची कधीही गरज पडत नाही. लेखकाच्या Spiritual Medicine for modern lifestyle diseases या २०१८ च्या पुस्तकात या सर्व बाबींची सविस्तर माहिती दिली आहे.

शेवटी हेच नमूद करावेसे वाटते की राजयोग हे अगदी सोपे परंतु अत्यंत प्रभावी Mindfulness Medilation आहे. Mindfulness म्हणजे मनाला ज्या श्रेष्ठ संकल्पावर स्थिर करावयाचे आहे, त्या संकल्पावर जितका वेळ पाहिजे तितका वेळ स्थिर करण्याची शक्ती वा किमया. **त्यामुळे वाचकांना हेच कळकळीचे आवाहन आहे की राजयोगाचा विधीपूर्वक नियमित प्रयोग करा व आपले जीवन व्यसनमुक्त, तणावमुक्त, व्याधिमुक्त व स्वस्थ बनवा. एकच मंत्र लक्षात ठेवा – KTP म्हणजे करून तर पहा.** स्वतः अनुभव घ्या व खात्री करा. शक्य असल्यास ब्रह्माकुमारीज्चे Peace of Mind Channel रोज फावल्या वेळात पहात राहा. हे Channel पूर्णतः आध्यात्मिक व जाहिरात विरहित असे आहे. त्याद्वारे आपल्याला मनाची शांती तर लाभेलच परंतु त्याचबरोबर मन सुसंस्कारित होत जाईल व मनोनिग्रह देखील वाढत जाईल.

***

(पान क्र.३० वरून)

भोजन आहे. सकारात्मक विचारामुळे आपल्यात दैवी गुण व शक्ती जागृत होतात. फलस्वरुप आपले जीवन देवतासमान बनते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आध्यात्मिकता हाच सकारात्मक विचारांचा अविनाशी स्त्रोत आहे. वर्तमान समयीच्या अशांतीचे मूळ कारण आहे, नकारात्मक विचार. म्हणूनच परमात्मा शिव पित्याने 'ब्रह्माकुमारीज्' द्वारे सकारात्मक विचारांची गंगा साऱ्या विश्वात प्रवाहीत केली आहे. जो या सकारात्मक विचारांच्या ज्ञानगंगेत व राजयोगाच्या लक्ष्यरुपी सोपद्वारे स्नान करेल, त्याचे जन्मोजन्मीचे विकर्म नष्ट होतील. तसेच भविष्य २० जन्मांकरिता देवीदेवता पदाची प्राप्ती होईल. इतकेच नव्हे तर तो शारीरिक व मानसिक दृष्ट्या देखील स्वस्थ, समृद्ध व सुखी बनेल. म्हणूनच सदैव सकारात्मक विचार व दृष्टिकोन बाळगा.

***

मडगाव (गोवा) : मोहन्स कार्निव्हल या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कलाकार धीरेंद्रनाथ सिंग यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. शोभा बहेन.

नागठाणे (सातारा) : 'श्रीगणेश चतुर्थी'च्या मुहुर्तावर ४२५ मुलांना श्रीगणेशाचा मुखवटा घातल्यानंतर, त्याविषयी जागतिक रेकॉर्ड सर्टिफिकेट प्राप्त करतांना ब्र. कु. डॉ. दीपक हरके व अन्य.

अंबाजोगाई : दिवाळी स्नेहमीलन कार्यक्रमात ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे या भाषण करतांना, शेजारी ब्र. कु. सुनिता व मंजू बहेन.

भुसावळ : दिवाळीच्या श्री लक्ष्मी-नारायणाच्या झांकी समवेत ब्र. कु. सिंधु दीदी व अन्य मान्यवर.

अहमदनगर : फिल्म अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांना भेटवस्तू देतांना ब्र. कु. भारती व रश्मी बहेन.

पुणे (ससाणे नगर) : आमदार योगेश टिळेकर यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र. कु. सुमिता बहेन.

पुणे (रविवार पेठ) : 'राजयोगाद्वारे मधुमेहापासून मुक्ती' या कार्यक्रमानंतर डॉ. वेदा नलावडे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. रोहिणी बहेन.

पणजी (गोवा) : भूमिपूजन कार्यक्रमाचे प्रसंगी भाषण करतांना प्रसिद्ध व्यापारी श्री. संतोष साळुंके, शेजारी ब्र. कु. शोभा व गीता बहेन तसेच अन्य मान्यवर.

Registration No. : MAHMAR/2007/21914

शांतिवन (आबू रोड) : 'खुशनुमा जिंदगी' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना राजयोगिनी दादी जानकीजी, उपाध्यक्ष भाजप. (गुज.) रमिला बहेन, वरिष्ठ भ्राता ब्र. कु. बृजमोहन भाई, ब्र. कु. मोहन सिंगल व अन्य मान्यवर.

वाशी (नवी मुंबई) : रिलायन्स जिओ कंपनीमध्ये ब्र. कु. शिवानी बहेन यांच्या कार्यक्रमानंतर भ्राता रजनीश जैन व भ्राता बाला अय्यर यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. शीला बहेन, शेजारी ब्र. कु. शिवानी बहेन, ब्र. कु. करुणाभाईजी व भ्राता केशव दुबे.

बोरिवली (प्रभु उपवन) : रस्ता वाहतुकीतील बळींसाठी जागतिक स्मृतीदिनाच्या प्रसंगी राजयोगिनी दिव्यप्रभा बहेन, फिल्म अभिनेता विश्वजीत चॅटर्जी, मिस इंडिया इशिका तनेजा, गुरुसेवक सिंग व अन्य मान्यवर.

अहमदनगर : ब्र. कु. डॉ. दीपक हरके हे ७५ जागतिक रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय आहेत. त्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करतांना वरिष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे.